आणि पाणियें प्रयत्ने माळी । अखंड जचे झांडा मुळीं ।
परि तें आघवें चि फळीं । जाणे जेवि ॥ ८४१ ॥

आणि माळी कष्ट करून झाडांचे मुळांस पाणी लावतो,
परंतु तो आपले परिश्रम जसे फळाच्याठिकाणी पहातो.

तैसे शास्त्राधारें तेणें । ईश्वरू चि एकु पावणें ।
हें फुडें जें कां जाणणें । तें एथ ज्ञान ॥ ८४२ ॥

त्याप्रमाणे शास्त्रानुसार आचरण करून व त्या योगानें एक ईश्वर
प्राप्त करून घेणें, हा दृष्टिकोन ठेवणे याला ज्ञान म्हणतात.

तें गा कर्मि जिये । सातवां गुणु होये ।
आणि विज्ञान हें पाहे । एवंरूप ॥ ८४३ ॥

हे ज्ञान ज्या कर्माचा सातवा गुण आहे आणि विज्ञान
हे पुढें सांगितलेल्या स्वरूपाचे आहे ते लक्षात घे.

तरि सत्वशुद्धिचिये वेळे । शास्त्रें कां ध्यानबळें ।
ईश्वरतत्वीं चि मिळे । निष्टंकबुद्धी ॥ ८४४ ॥

शुद्धसत्व होऊन शास्त्रज्ञानानें व ध्यानाच्या अभ्यासाने
ईश्वरतत्त्वामध्येंच बुद्धी निश्चयेंकरून मिळते,

हें विज्ञान बरवें । तें गुणें जें आठवें ।
आणि आस्तिक्य जाणावे । नववा गुणु ॥ ८४५ ॥

अर्जुना, हें चांगलें विज्ञान आहे. तें या गुणकर्मांत आठवें गुणरत्न
आहे आणि 'आस्तिक्य' हा नववा गुण आहे, असें समजावें.

पैं राजमुद्रा आथिलेया । प्रजा भजे भलतेया ।
तेवि शास्त्रें स्वीकरिलेयां । मार्गमात्रातें ॥ ८४६ ॥

हें पहा, राजमुद्रांकित मनुष्य कोणीही असला तरी त्याला जशी
प्रजा मानते, त्या प्रमाणें शास्त्रानें स्वीकारलेल्या सर्व मार्गांना,

आदरें कां वर्त्तणें । तें आस्तिकत्व मी ह्मणें ।
तो नववा गुणु जेणें । कर्म साच ॥ ८४७ ॥

जें आदरानें मानणें, त्याला मी आस्तिक्य म्हणतों. तो नववा
गुण आहे आणि त्यामुळेच त्याकर्माला सत्याचा आधार मिळतो.

एवं नवै शमादिक । गुण जेथ निर्दोख ।
तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ ८४८ ॥

याप्रमाणें शमादिक नऊ गुण जेथें निर्दोष दृष्टीस
पडतात तें ब्राह्मणाचें स्वाभाविक कर्म समजावें.

तो नवगुणरत्नाकरु । ययां नवां रत्नांचा हारु ।
न फेडित ले दिनकरु । प्रकाशु जैसा ॥ ८४९ ॥

ज्याला या नवरत्नांचा हार लाभला, तो नवगुणांचा रत्नाकरच होतो. किंवा
सूर्य जसा अखंड प्रकाश देतो तसे हे गुण त्याच्या अंगी निरंतर असतात;

नाना चांपाचां पौळीं पूजिला । चंद्रु चंद्रिका धवळिला ।
कां चंदनु निजें चर्चिला । सौरभ्यें जेवि ॥ ८५० ॥

चांफ्याच्या फुलांनीं चांफा जसा सदैव पूजिलेला असतो, अथवा चंद्र आपल्या प्रभेनेंच
जसा प्रकाशित असतो, किंवा चंदन आपल्या सुगंधाने जसा चर्चिलेला असतो,

तेवि नवगुणटिकलग । लेणें ब्राह्मणाचें हें अव्यंग ।
कहीं चि न संडी आंग । ब्राह्मणाचें ॥ ८५१ ॥

त्याप्रमांणे नऊ गुणांच्या रत्नांनी जडलेला हा ब्राह्मणाचा निर्दोष
अलंकार असतो; व तो अलंकार ब्राह्मणाचें अंग कधींच सोडीत नाहीं,

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्
दानमीश्वरभावश्च क्षात्रकर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

शौर्यम्, तेजः, धृतिः, दाक्ष्यम्, युद्धे, च, अपि, अपलायनम्
दानम्, ईश्वर, भावः, च, क्षात्रम्, कर्म, स्वभावजम्

शौर्य, तेज, धैर्य, दक्षता, युद्धामध्यें पराङःमुख न होणें, ईश्वरभाव,
औदार्य आणि नेतृत्व या स्वाभाविक गुणांनुसार क्षत्रिय कर्म करतात.

आतां उचित जें क्षत्रिया । तें हिं कर्म धनंजया ।
सांघों आइक प्रज्ञेचिया । भरोवरी ॥ ८५२ ॥

आता, धनंजया क्षत्रियाला जे कर्म उचित
आहे ते मी सांगतों; तूं बुद्धीच्या सामग्रीनें ऐक.

तरि हा भानु तेजें । नापेक्षी जेवि विरजें ।
कां हिंसें न पाहिजे । जावळिया ॥ ८५३ ॥

सूर्य हा प्रकाशाच्या बाबतीत ज्याप्रमांणे कोणाच्या साह्याची अपेक्षा
करीत नाही व सिंह शिकार करण्याकरिता साथीदार जसा शोधीत नाही.

ऐसा स्वयंभु जो जीव लाटु । सावायेंविण उद्भटु ।
तो शौर्य गा श्रेष्ठु । पहिला गुणु ॥ ८५४ ॥

तसा जो स्वयमेव बलशाली व मदतीशिवाय महावीर असतो
व; हें जें 'शौर्य' तो ह्या क्षत्रियांच्या गुणांतील पहिला होय.

आणि सूर्याचेनि प्रतापें । कोडि ही नक्षत्रें हारपे ।
ना तो तऱ्हीं न लोपे । सचंद्रीं तिहीं ॥ ८५५ ॥

आणि सूर्याच्या प्रकाशानें कोटयवधी नक्षत्रें लोपून जातात. पण
चंद्रासह सर्व नक्षत्रें एकवटलीं तरीही सूर्य त्यांच्यामुळे लोपत नाही,

तैसा आपुलेनि प्रौढगुणें । जगासि विस्मयो देणें ।
आपण तरि न क्षोभणें । काइसेनि हीं ॥ ८५६ ॥

त्या प्रमाणें आपल्या सामर्थ्यानें व गुणानें लोकांना विस्मयकारक
वाटतो; पण स्वतः जो कशानेही क्षोभ पावत नाही, विचलित होत नाही.

तें प्रागलभ्य रूप तेजा । जिये कर्मि गुणु दूजा ।
आणि धीरु तो तीजा । तेथिचा गुणु ॥ ८५७ ॥

असें जें अलौकिक सामर्थ्य, तेंच, 'तेज' होय, तोच या क्षात्रप्रकृतीचा
दुसरा गुण; व 'धीर' हा त्याच प्रकृतीचा तिसरा गुण होय.

वरिपडिलेयां आकाश । बुद्धीचे डोळे मानस ।
झांकी ना तें साहस । धैर्य जेथ ॥ ८५८ ॥

आकाश कोसळून पडलें, तरी ज्या गुणामुळें ज्याची बुद्धी
मनाकडून अंध केली जात नाही, तें या क्षत्रियकर्मांत धैर्य होय.

आणि पाणी होये भलतेतुकें । परि तें जीणौनि पद्म फांके ।
कां आकाश ऊंचिया जींके । आवडेतेया ॥ ८५९ ॥

पाणी कितीही खोल असले तरी कमळ त्या पाण्याच्या वर येऊन
विकसते. अथवा आकाश उंचीच्या बाबतीत कोणालाही जिंकते.

तेवि विविधा अवस्था । पातलिया जीणौनि पार्था ।
प्रज्ञा फळतेया अर्था । वेझ देणें जें ॥ ८६० ॥

अर्जुना, त्याप्रमाणें विविध अवस्था प्राप्त झाल्या असतां, प्रज्ञेनें
त्यांना जिंकून, इष्ट फळ देणाऱ्या कार्यात चाणाक्षपणे प्रवेश करणे.

तें दक्षत्व गा चोख । जेथ चौथा गुणु देख ।
आणि जूझ अलौकिक । पांचवागुणु ॥ ८६१ ॥

याप्रमाणें सावधगिरी ठेवणें, याला 'दक्षता' म्हणतात, व तो क्षात्र
प्रकृतीचा चवथा गुण होय. व अलौकिक झुंजणें हा पाचवा गुण.

आदित्याचीं झाडें । ठाकति रविबिंबाकडे ।
तेवि समोर शत्रूपुढें । होणें सदा ॥ ८६२ ॥

सूर्यफुलाची झाडें ज्याप्रमाणे नेहमी सूर्याकडे सन्मुख
असतात, त्या प्रमाणें शत्रूपुढें नेहमीं समोर होणें,

माहेवणी प्रयत्नेंसिं । चुकविजे सेजे जैसी ।
रिपू पाठि नेंदिजें तैसी । रणांगणीं ॥ ८६३ ॥

गर्भवती स्त्री यत्नपूर्वक पतीला सेजेवर येऊ देण्याचे टाळते,
त्याच प्रमाणे खरा क्षत्रिय शत्रूला रणात पाठ दाखविण्यचे टाळतो.

हा क्षत्रियाचां आचारीं । पांचवां गुणेंद्रु अवधारीं ।
चौं हीं पुरुषार्था शिरीं । भक्ति जैसी ॥ ८६४ ॥

चारही पुरुषार्थात भक्ती हा पुरुषार्थ जसा श्रेष्ठ त्याप्रमाणे,
क्षत्रियांच्या आचारांतील हा सर्वश्रेष्ठ असा पांचवा गुण आहे.

आणि जालेनि फुलें फळें । शाखिये जैसे मोकळे ।
कां उदार परिमळें । पद्माकर ॥ ८६५ ॥

ज्याप्रमाणे फुले फळे आली की ती देण्यात शाखा जशा उदार असतात,
किंवा कमळांचा समुदाय जसा सुवास देण्याच्या बाबतींत उदार असतो,

नाना आवडिचेनि मापें । चांदिणें भलेतेणें घेपे ।
पुढिलाचेनि संकल्पे । तैसें जें देणें ॥ ८६६ ॥

किंवा कोणीही चांदणे मनमुराद घेऊ शकातो त्याप्रमाणे
दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणें त्याला जें हवें तें देणें,

तें उमप गा दान । जेथ सावें गुणरत्न ।
आणि आज्ञे एकायतन । होये जेणें कां ॥ ८६७ ॥

याला 'अमर्याद दान' असें म्हणतात तें क्षात्र प्रकृतीचें सहावें
गुणरत्न होय. आणि आज्ञेला मूळ असा एकच आधार असणे,

पोखुनि अवेव आपुले । करविजति मानविलें ।
तेवि पाळणें लोभविलें । जग जें भोगी ॥ ८६८ ॥

आपल्या अवयवांना धडधाकट करून त्यांच्याकडून कोणतेही काम करवून
घेता येते. त्याप्रमाणें प्रजेचें प्रेमानें पालन करून नंतर त्यांचा लोभ प्रप्त करणे,

तेया नांव ईश्वरभावो । जो सर्वसामग्रियेचा ठावो ।
तो गुणामाझि राॐ । सातंवा जेथ ॥ ८६९ ॥

यालाच 'ईश्वरभाव' असे म्हणतात व तो सर्व सामर्थ्याचें
ठिकाण आहे. तो या क्षात्र प्रकृतीचा सातवा गुण होय.

ऐसे जे शौर्यादिकीं । इहिं सातवां गुणीं विशेषीं ।
अळंकृत सप्तरुषीं । आकाश जैसें ॥ ८७० ॥

अशा शौर्य आदिकरून सात गुणांनीं जो पुरुष विशेष अलंकृत
आहे, ज्या प्रमाणें आकाश हें सप्त ऋषींनीं जसे सुशोभित दिसतें,

तैसें सप्तगुणीं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र ।
तें साहाजें जाण क्षात्र । क्षत्रियाचें ॥ ८७१ ॥

त्याप्रमाणे या सात अलौकिक गुणांनी जे अलंकृत
झालेले आहे, ते कर्म क्षत्रियाचे स्वाभाविक कर्म जाण.

नाना क्षत्री नव्हे नरु । तो सत्वसोनेयांचा चि मेरु ।
ह्मणौनि गुणस्वर्गा आधारु । सातां इयां ॥ ८७२ ॥

अथवा, असा तो क्षत्रिय मनुष्य नव्हे, तर तो सत्त्वगुणरुपी सोन्याचा मेरुपर्वत आहे. म्हणून या सात गुणरूपी स्वर्गांचा तो आधारच समजावा.

नाना सप्तगुणार्णवि । परिवारली बरवी ।
हे क्रिया नव्हे पृथिवी । भोगीतसे तो ॥ ८७३ ॥

किंवा या सात गुणांच्या समुद्रानें शोभित असलेली ही पृथ्वीच आहे व ती तो क्षत्रिय भोगीत आहे;

कां गुणां सातें वोघीं । हे क्रिया ते गंगा जगीं ।
तेया महोदधीचां आंगीं । विलसत जैसी ॥ ८७४ ॥

किंवा या सात गुणांच्या ओघांनी युक्त अशी ही क्रियारूप गंगा या क्षत्रियरूपी महासागराच्या अंगीं जशी कांही शोभत आहे.

हे परी बहुवस देख । शौर्यादिगुणात्मक ।
कर्म गा नैसर्गिक । क्षत्रियजातीसि ॥ ८७५ ॥

परंतु हें फार वर्णन राहूं दे. एवढे लक्षात घे की शौर्यादी गुणांनी युक्त कर्म हे क्षत्रिय जातीला स्वाभाविक आहे.

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

कृषि, गौरक्ष्य, वाणिज्यम्, वैश्यकर्म, स्वभावजम्
परिचर्या, आत्मकम्, कर्म, शूद्रस्य, अपि, स्वभावजम्

शेतकी करणे, गुरे बाळगणे, क्रयविक्रय करणे हीं वैश्यांचीं स्वभावज कर्मे आहेत. आणि श्रम व इतरांची सेवा करणे हे शूद्रांचेही स्वभावसिद्ध कर्म होय.

आतां वैशाचिये जाती । उचित जें महामती ।
तें आइक निरुती । क्रिया सांघों ॥ ८७६ ॥

आतां हे महामते, वैश्य जातीला जें योग्य कर्म आहे; तें निश्चयात्मक सांगतो, ऐक.

तरि भूमि बीज नांगरू । या भांडवलाचा आधारु ।
घेउनि लाभु अपारु । मेळवणें जें ॥ ८७७ ॥

त्याच्या कर्माला आधार म्हणजे जमीन, बी-बियाणे व नांगर व या भांडवलाचा आधार घेऊन त्याने खूप लाभ मिळवायचा असतो

किंबहुना कृषि जीणें । गोधनें राखौनि वर्त्तणें ।
कां सवंगाची वीकणें । महर्गि वस्तु ॥ ८७८ ॥

किंबहुना शेती करून निर्वाह करणे, गाईगुरे राखावी व उपजीविका करावी, अथवा स्वस्त वस्तू घेऊन त्या महागाईने विकणे,

आणि वैश्यक्षत्रियब्राह्मण । हे द्विजन्मे तीन्ही वर्ण ।
यांचे जें सुश्रूषण । तें शूद्रकर्म ॥ ८७९ ॥

आणि वैश्य, क्षत्रिय, ब्रम्हण हे तिन्ही वर्ण द्विजन्मे आहेत, व यांची शुश्रूषा करणे हे शूद्रांचे स्वाभाविक कर्म होय.

पैं द्विजसेवेपरौतें । धावणें नाहिं शूद्रातें ।
एवं चतुर्वर्णाचिं । दाविलिं कर्मे ॥ ८८० ॥

परंतु द्विजांच्या सेवेवांचून शूद्राला धांवावे लागत नाहीं, अशा प्रकारे मी चारी वर्णांना उचित अशी कर्मे कोणती ते सांगितले.

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥ ४५ ॥

स्वे, स्वे, कर्मणि, अभिरतः, संसिद्धिम्, लभते, नरः
स्वकर्म, निरतः, सिद्धिम्, यथा, विन्दति, तत्, श्रृणु

आपापल्या कर्माच्या ठायीं जो तत्पर असतो, त्या मनुष्यास वैराग्य
प्राप्त होते. हे कसे शक्य होते याविषयी आता माझ्याकडून ऐक.

आतां यें चि गा विचक्षणा । वेगळेलेया वर्णा ।
उचित जैसें करणां । शब्दादिक ॥ ८८१ ॥

हे अर्जुना, या प्रमाणें शब्दादि विषय श्रोत्रादि इंद्रियांना योग्य
आहेत, त्याप्रमाणे हीच कर्मे या वेगवेगळ्या वर्णाना योग्य आहे.

नातरि जळदच्युता । पाणियां उचित सरिता ।
सरितेसि पांडुसुता । सिंधु उचित ॥ ८८२ ॥

किंवा मेघांतून पडणाऱ्या पावसाच्या पाण्याला जशी
नदीयोग्य त्याप्रमाणें हे अर्जुना नदीला समुद्र योग्य आहे,

तसैं वर्णाश्रमवशें । जें करणें आलें असे ।
गोरेया आंगा जैसें । गोरेपण ॥ ८८३ ॥

तसें वर्णाश्रमधर्माप्रमाणें जें आवश्यक कर्म, कर्तव्य
ठरते, जसे गोऱ्या माणसाचे गोरेपण त्याला शोभते.

तेया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा ।
प्रवर्त्तवियालागि प्रेमा । अढळ कीजे ॥ ८८४ ॥

हे विरोत्तमा, स्वभावजन्य कर्माचें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे
आचरण करण्याविषयी आपली बुद्धी अचल राखावीं.

पैं आपुलें चि रत्न थितें । घेपे पारखियाचेनि हातें ।
तैसें स्वकर्म आपैतें । शास्त्रें करावें ॥ ८८५ ॥

आपल्या जवळ असलेले रत्न, रत्नपारख्याकडून पारखून घ्यावें,
तसें आपलें स्वकर्म शास्त्राच्या आधाराने निश्चित करुन घ्यावें.

जैसी दीठि असे आपुलां ठांइं । परि दीपेंविण भोगु नाहि ।
मार्गु न ल्हांतां काहिं पाइं । असतां होए ॥ ८८६ ॥

जशी आपल्याजवळ दृष्टी असूनही दिव्यावांचून तिचा उपयोग होत
नाही, किंवा वाटच सापडली नाहीं, तर पाय असून काय होणार ?

ह्मणौनि जातिवशें साचारु । सहजु असे जो अधिकारु ।
तो आपुलां शास्त्रिं गोचरु । आपणपेयां कीजे ॥ ८८७ ॥

म्हणून ज्ञातीधर्माला अनुसरून जो आपला योग्य अधिकार
असेल, तो आपपल्या शास्त्रानुसार समजून घ्यावा.

मग घरिचा चि ठेवा । आणि डोळां दावी दिवा ।
तरि काइ घेंतां पांडवा । आळसु असे ॥ ८८८ ॥

मग घरीं असलेलाच ठेवा, जर डोळ्यांना दिव्यानें
दाखवला; तर तो घेण्यास कसली अडचण आहे ?

तैसें स्वभावें भागा आलें । वरि शास्त्रें खरें केलें ।
तें विहित जो आपुलें । आचरे गा ॥ ८८९ ॥

तसें, स्वभावतः आपल्या वांट्यास आलेले आणि तेंच जे शास्त्रानेंही
ज्याला पुष्टी दिली, तें आपलें विहित कर्म जो आचरण करतो.

परि आळसु सांडौनि । फळकामु दवडौनि ।
आंगें जीवें मोडौनि । तेथ चि भरु ॥ ८९० ॥

परंतु आळस टाकून देऊन व फलेच्छा टाकून शरीरानें व
मनानें त्या कर्माला आरंभून, त्याच कर्मचरणांत दंग होतो;

वोघीं पडिलेयां पाणी । नेणे आनानीं वाहाणीं ।
तैसा जिये आचरणीं । व्यवस्थौनि ॥ ८९१ ॥

ओघांत पडलेले पाणी जसें दुसऱ्या कोठेंही न वळतां ओघाबरोबरच जाते,
त्याप्रमाणे व्यवस्थित पणे तो शास्त्रानुसार विहित कर्म करीत राहतो.

अर्जुना जें इयापरीं । तें विहित कर्म करी ।
तो मोक्षाचां ऐली द्वारीं । पैठा होऐ ॥ ८९२ ॥

अर्जुना, जो या प्रमाणे ते विहित कर्म स्वतः करतो तो
मोक्षाच्या अलीकडलें जें द्वार 'वैराग्य' तेथें प्राप्त होतो.

जें अकरणा आणि निषिद्धा । न वचे चि काहीं संबंधा ।
ह्मणौनि भावा विरुद्धा । मूकला तो ॥ ८९३ ॥

जे आकारण व निषिद्ध या कर्माचा संबंध होऊं देत नाहीं, म्हणून
आत्मप्राप्तीसविरुद्ध जो संसार त्याच्या भयापासून मुक्त होतो.

आणि काम्यकर्माकडे । न परते चि तेकडे ।
तेथ चंदनाचे खोडे । न ले चि तो ॥ ८९४ ॥

आणि तो काम्य कर्माकडे कौतुकानेही वळत नसल्यामुळें,
चंदनाचे खोडेही पायात अडकवून घेत नाही.

येर नित्य कर्म तंव । फळत्यागें वेचलें सर्व ।
म्हणौनि मोक्षाची सींव । टाकूं लाहे ॥ ८९५ ॥

बाकीचे नित्य कर्म म्हणून जेवढे आहे तेव्हढे फलत्यागाने सर्व
ईश्वरार्पण करतो म्हणूनच तो मोक्ष स्थितीपर्यंत पोचतो.

ऐसेनि शुभाशुभीं संसारीं । सांडिला तो अवधारीं ।
वैराग्यमोक्षद्वारीं । उभा ठाके ॥ ८९६ ॥

अशा प्रकारें कर्माचें निरसन करून शुभाशुभ संसारातून
तो सुटला जातो व वैराग्यरूपी मोक्षाच्या द्वारांत उभा राहतो.

जे सकळभाग्याची सीमा । मोक्षलाभाची प्रमा ।
नाना कर्ममार्गश्रमा । सेवटु जेथ ॥ ८९७ ॥

जें वैराग्य सर्व भाग्याची सीमा आहे व जे मोक्ष प्राप्तीचे ज्ञान करून देणारे
आहे, अथवा कर्ममार्गाच्या श्रमांचा ज्या वैराग्याच्या ठिकाणीं शेवट होतो.

मोक्षफळें दीधली वोल । जें सुकृततरूचें फूल ।
तिये वैरागीं ठेवी पाउल । भवरु जैसा ॥ ८९८ ॥

जे वैराग्य म्हणजे मोक्षफळानें दिलेलें तारण होय, व जें पुण्यरूप वृक्षाचें
फूल आहे, त्या वैराग्यरूपी फुलांवर भ्रमराप्रमाणें तो पाऊल ठेवतो.

पैं आत्मज्ञानसुदिनाचा । वाधावा सांघे तेया अरुणाचा ।
उदो तेया वैराग्याचा । ठावो पावे ॥ ८९९ ॥

अर्जुना, आत्मज्ञानाचा सूर्योदय होणार ही वार्ता सांगणारा
अरुणोदय जो हा वैराग्यभाव, त्या वैराग्याचा साधकाला लाभ होतो.

किंबहूना आत्मज्ञान । जेणे हाता ए निधान ।
तें वैराग्य दिव्यांजन । जीवें ले तो ॥ ९०० ॥

वैराग्य म्हणजे आत्मज्ञानरूपी द्रव्यनिधी सापडण्यासाठी मिळालेले दिव्य
अंजनच ! ते वैराग्यरूप दिव्यांजन तो आपल्या बुद्धींने धारण करतो.

ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाये पांडुसुता ।
अनुसरौनि विहिता । कर्मा येया ॥ ९०१ ॥

अर्जुना, अशा प्रकारें विहित कर्माला अनुसरून आचरण
केले असतां, मोक्षाची योग्याता प्राप्त होणारी सिद्धी प्रप्त होते.

विहित कर्म पांडवा । आपुला अनन्यु वोलवावा ।
आणि हे चि प्रेमसेवा । सर्वात्मकाची ॥ ९०२ ॥

हे पांडवा, विहित कर्म हा आपला अनन्य धर्म आहे
आणि मी जो सर्वात्मक, त्या माझी श्रेष्ठ सेवा आहे.

पैं आघवां चि भोगेंसिं । पतिव्रता क्रीडे प्रियेंसिं ।
किं तेया चि नांव जैसी । तपें तिया केलीं ॥ ९०३ ॥

पतिव्रता स्त्री सर्व भोगांसह आपल्या पतीबरोबर
क्रीडा करते. त्याच तिच्या आचरणास 'तप' म्हणावें,

कां बाळका एकि माए- । वांचौनि जीणें काइ आहे ।
ह्मणौनि सेवा कीं तो होए । पाटाचा धर्मु ॥ ९०४ ॥

किंवा बाळाला आईवाचूंन जगण्यास दुसरें साधनच नाहीं, म्हणून
त्यानें तिचीच सेवा करावी हेंच जसें त्याचें श्रेष्ठ कर्तव्य होय.

नाना पाणी ह्मणौनि मासा । गंगा न संडीतु जैसा ।
सर्वतीर्थसंवासा । वरिपडा जाला ॥ ९०५ ॥

किंवा पाणी म्हणून गंगेचा आश्रय न सोडतां जसा मासा गंगेत
राहतो, मग सर्व तीर्थवासाचे फळ त्याच्या पदरीं आपोआप पडतें.

तैसा आपुलिया विहिता । उपाॐ असे न विसंबता ।
ऐसा कीजे किं जगन्नाथा । आभारु पडे ॥ ९०६ ॥

तसें आपल्या विहित कर्माचें आचरण केल्यावाचूंन दुसरा उपायच नाहीं,
अशा भावनेने आचरण केल्यास प्रत्यक्ष जगन्नाथ आपला आभारी होतो.

आगा जेया जें विहित । तें ईश्वराचें मनोगत ।
ह्मणौनि केलेया निभ्रांत । परितोखु पावे ॥ ९०७ ॥

अरे, ज्यांचें जें विहित कर्म नेमलेलें आहे, तेंच त्यानें करावें असें
ईश्वराचें मनोगत आहे. ते जर आपण केले तर तो ईश्वरच प्राप्त होतो.

पैं जीवाचां कसीं उतरली । ते दासि किं गोसांविणि जाली ।
तैसी सेवेची तेयां माउली । विहित जेवि ॥ ९०८ ॥

अरे, जी अंतःकरणाच्या कसोटीला उतरून प्रिय झाली, तर ती मूळची दासी असली तरी मालकीण
होते; किंवा स्वामिभक्त शूर वीर स्वामीसाठी प्राणार्पणही करतो तेव्हां स्वामी त्याला इनाम पत्र देतो.

तैसें ते स्वामिचेया मनोभावा । न चूकिजे हे चि सेवा ।
एरि ते पांडवा । वणिज करणें ॥ ९०९ ॥

अर्जुना, अशा रीतीने स्वामीचा मनोरथ न चुकविणारी जी सेवा, तिलाच
खरीखरी उत्कृष्ट सेवा म्हणतात, अन्य कर्मे म्हणजे केवळ व्यापार होय.

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणां तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥

यतः, प्रवृत्तिः, भूतानाम्, येन, सर्वम्, इदम्, ततम्
स्वकमर्णा, तम्, अभ्यर्च्य, सिद्धिम्, विन्दति, मानवः

ज्याच्या सत्तेने सर्व भूतांची उत्पत्ती होते, आणि ज्याने हे सर्व विश्व व्यापले आहे त्या सर्वव्यापी
असणाऱ्या भगवंतांची पूजा करून, मनुष्य आपल्या स्वकर्माद्वारे सिद्धी प्राप्त करू शकतो.

ह्मणौनि विहितक्रिया केली । नव्हे तेयाची खूण पाळिली ।
जेयापासौनि कां आलीं । आकार भूतें ॥ ९१० ॥

म्हणून हें नुसतें विहित कर्माचें आचरण नव्हे, तर ज्या परमात्म्यापासून हे सर्व प्राणी आकाराला आले आहेत, त्या ईश्वराची आज्ञा पाळली असे होते.

जो अविद्येचिया चिंधिया । गुंडाळूनि जीवबाउलिया ।
खेळवीतसे तिगुणिया । अहंकाररज्जु ॥ ९११ ॥

जो परमात्मा अज्ञानरूपी चिंध्या गुंडाळून बनविलेल्या जीवरूपी बाहुल्या तयार करतो, आणि तीन पदरी अहंकाररूप सूत्रानें त्यांना खेळवितो;

जेणें जग हें समस्त । आंतु बाहिरि भरित ।
जालें आहे दीपजात । तेजें जैसें ॥ ९१२ ॥

ईश्वराच्या योगानें हे सर्व जग आंतबाहेर पूर्णपणें भरलेले आहे; प्रकाशाने सर्व दिवे जसे आंतबाहेर एका तेजाने व्यापून आहेत,

तेया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमाची वीरा ।
पूजा केली होये अपारा । तोखालागि ॥ ९१३ ॥

हे वीरा अर्जुना, त्या सर्वात्मक ईश्वराला विहित कर्मरूप पुष्पांनी केलेली पूजा त्याच्या अपार संतोषाला कारणीभूत होते.

ह्मणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें ।
वैराग्यसिद्धि दिजे । पसाया तेया ॥ ९१४ ॥

म्हणून त्या पूजेच्या योगाने संतुष्ट झालेला आत्मराज त्या विहिताचरण करणाऱ्या भक्ताला वैराग्यलाभाचा प्रसाद देतो.

जैं वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवसें ।
हें सर्व ही नावडे जैसें । वांत होणें ॥ ९१५ ॥

मग त्या वैराग्याच्या अवस्थेंत केवळ ईश्वराचा वेध लागल्या कारणानें बाकी ऐहिक असे सारे, वामनवत् तिरसकृत वाटते.

प्राणनाथाचिये आधी । विरहिणीतें जीणें बाधी ।
तैसें सुखजात त्रिशुद्धी । दुःखा चि लागि ॥ ९१६ ॥

ज्याप्रमाणें आपल्या प्रिय पतीच्या वियोगानें विरहिणीला जिणेही नकोसे होते. त्याप्रमाणें संसारांतील सर्व सुखें त्याला खरोखर दुःखवत् भासतात.

सम्यग्ज्ञाना उदैजतां । वेधें चि तन्मयता ।
उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ ९१७ ॥

ईश्वराचें अपरोक्ष ज्ञांन उत्पन्न होण्याचे पूर्वी ईश्वराच्या वेधानेंच तन्मयता उत्पन्न होते; अशी बोधाची योग्यता त्यास लाभते.

ह्मणौनि मोक्षलाभालागि । जो व्रतें वाहांतसे आंगीं ।
तेणे स्वधर्मु चांगीं । आधिष्ठावा ॥ ९१८ ॥

म्हणून मोक्षाच्या लाभाकरता जो स्वतः अंगानें व्रतांचें आचरण करतो, त्यानें स्वधर्माचें निष्ठापूर्वक आचरण करावें.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥

श्रेयान्, स्वधर्मः, विगुणः, परधर्मात्, स्वनुष्ठितात्
स्वभावनियतम्, कर्म कुर्वन् न, आप्नोति, किल्बिषम्

आचरण्यास सुलभ अशा परधर्मापेक्षा स्वतःचा धर्म आचरण्यास कठिण असला तरी स्वधर्म हा श्रेष्ठ आहे. स्वभावसिद्ध कर्म करणारा मनुष्य दोषास पात्र होत नाहीं.

आगा आपला हा स्वधर्मु । आचरणें जऱ्हीं विषमु ।
तऱ्हीं पाहावा तो परिणामु । फळैल जेणें ॥ ९१९ ॥

आपला स्वधर्म आचरण करण्यास कठिण असला, तरी त्यापासून
परिणामीं कोणतें फल लाभणार आहे, त्यावर लक्ष ठेवले पाहीजे.

जैं सुखालागि आपणपेयां । निंब चि आथि धनंजया ।
तें कडुवटपणा तेया । भोगिजे ना ॥ ९२० ॥

अर्जुना, स्वतःच्या आरोग्यासाठी कडुनिंब हितकर
असला, तर त्याच्या कडवटपणाला कंटाळू नये.

फळणेयां ऐलीकडे । केळीतें पाहांतां आशा मोडे ।
ऐसें त्यजिलें तरि जाडे । तैसें कें गोमटें ॥ ९२१ ॥

केळीला फळे धरण्याआधी केळ पाहिली तर निराशा होते; अशा वेळीं
तें केळीचें झाड कापून टाकलें, तर तिचीं उत्तम फळें कशीं मिळतील ?

तेवि स्वधर्मु सांकडु । देखौनि केला जरि कीडु ।
तरि मोक्षसुरवाडु । अंतरला ॥ ९२२ ॥

तसाच स्वधर्म कष्टकारक आहे म्हणून स्वधर्म जर
त्याचा त्याग केला, तर मग मोक्षाचे सुख अंतरेलच कीं.

आणि आपुली माए । कुब्ज जऱ्हीं आहे ।
तऱ्हीं जीणें जीजे तें नोहे । स्नेह कुऱ्हें कीं ॥ ९२३ ॥

आणि आपली आई जरी कुबडी असली, तरी ज्या तिच्या
प्रेमामुळे आपण जगतों, ते प्रेम काही वाकडे असत नाही.

एरि जिया पराविया । रंभेहुनि बरविया ।
तिया काइ करविया । बाळकें तेणें ॥ ९२४ ॥

इतर दुसऱ्या स्त्रिया रंभेहूनही सुंदर असल्या
तरी त्यांशीं त्या बाळकाला काय करायचें आहे ?

आगा पाणियांहूनि बौहें । तूपीं गुणु कीरु आहे ।
परि मीनां काइ होए । असणें तेथ ॥ ९२५ ॥

अरे अर्जुना, पाण्यापेक्षा तुपांत गुण पुष्कळ आहेत,
तरी माशाला तुपांत ठेवलें असतां तो जगेल का ?

पैं आघवियां जगीं जें विष । तें कीडेयाचें पीयूष ।
आणि जगा गूळ देख । तेथ मरण तेया ॥ ९२६ ॥

सगळ्या जगाला जें विष, तेंच विषांत वाढणाऱ्या किड्यांना पीयूष वाटते, आणि
जगाला गोड वाटणारा जो गूळ, तो त्या विषकिड्यांना प्राणघातक होतो

ह्मणौनि विहित जें जेया जीणें । फीटे संसाराचें धरणें ।
क्रिया कठोर तऱ्हीं तेणें । तें चि करावें ॥ ९२७ ॥

म्हणून ज्याचें जें विहित कर्म आहे ज्या योगानें संसाराचें बंधन फिटेल,
तें कितीही कष्टसाध्य असले तरी त्याचेंच आचरण करावें.

एरा पराचारा बरविया । ऐसें होईल टेंकलेयां ।
पायांचे चालणें डोया । केलें जैसें ॥ ९२८ ॥

दुसऱ्याचे आचार बरे वाटतात म्हणून तें करू लागणें
म्हणजे, पायांचें चालणें डोक्यानें करावें तसें होईल.

ययालागि कर्म आपुलें । जें जातिस्वभावेंसिं आलें ।
तें करी तेणे जींतलें । कर्मबंधातें ॥ ९२९ ॥

म्हणून जातिस्वभावप्रमाणें आपल्या वांट्यास जें कर्म
आलें, तेंच केलें असतां कर्मबन्धावर जय मिळतो.

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

सहजम्, कर्म कौन्तेय, सदोषम्, अपि, न, त्यजेत्,
सर्वारम्भाः, हि, दोषेण, धूमेन, अग्निः, इव, अवृताः

हे कौंतेया जन्मतःच प्राप्त झालेले कर्म सदोष जरी असले, तरी ते सोडू नये; कारण
जसा धुराने अग्नि व्यापलेला आहे, तसे सर्व कर्मांचे आरंभ दोषानें व्यापलेले आहेत.

आणि स्वधर्मू चि पाळावा । परधर्मु तो गाळावा ।
हा नियमु हीं पांडवा । न कीजे चि पां ॥ ९३० ॥

आणि अर्जुना, आपला धर्म पाळावा व दुसऱ्याचा
धर्म टाळावा, हा नेमच जर केला नाहीं,

तऱ्हीं आत्मा द्दष्ट नोहे । तंव कर्म करणें कां ठाए ।
आणि करणें तेथ आहे । आयासु आधीं ॥ ९३१ ॥

तर आत्मा जोंपावेतों द्दष्ट झाला नाहीं, तोपर्यंत कर्म करणे सुटणार
आहे काय ? आणि कर्म करावयाचे म्हटले म्हणजे प्रथम कष्ट आलेच.

ह्मणौनि भलतिये कर्मी । आयासु जरि उपक्रमीं ।
तरि काइ स्वधर्मी दोषु सांघें ॥ ९३२ ॥

मग, जर कोणत्याही कर्माचरणांत जर आरंभी कष्ट हे
आहेतच, तर मग स्वधर्मच आचरलेला काय वाईट ?

अगा उजू वाटा चालावें । तऱ्हीं पाये चि सीणवावे ।
ना आडरानें धांवावें । तऱ्हीं तें चि ॥ ९३३ ॥

अरे, सरळ वाटेनें जावें तर पायांना शीण होतो, अथवा आड
रानानें धांवले तरी तेथेंही पायच शिणवावे लागतात.

पैं शिळा कां सिधौरिया । दाटणें एक धनंजया ।
परि जें वाहांतां । विसावेया । मिळैल तें घेपे ॥ ९३४ ॥

तसेच अर्जुना, धोंडा आणि शिदोरी दोहोंचे ओझे सारखेच ! परंतु ज्याचें
ओझें प्रवासांत श्रम शमविण्याचें साधन होईल, तेच ओझें वागवावें हें बरें.

यऱ्हविं कणा भूसा । कांडितां हिं सोसु सरिसा ।
जें चि रांधणें माणुसा । तें चि हवि ॥ ९३५ ॥

धान्य आणि भूस कांडतांना श्रम सारखेच पडतात, व कुत्र्याकरितां मास
शिजवण्यांत जितके श्रम आहेत, तेच तर हविष्यान्न शिजविण्यासाठीं आहेत.

परि धर्मपत्नी कां धांगडि । पोसितां जरि एकि वोढि ।
तरि कां आपखडि । आणावी आंगां ॥ ९३६ ॥

परंतु लग्नाची बायको व राखलेली वेश्या यांना पोसण्यात खर्च
होतोच, तर मग अपकिर्तीचा कलंक तरी आंगास कां लावून घ्यावा ?

दधि जळाचेया गुसळणां । व्यापार सारिखा विचक्षणा ।
वाळुवे तिळां घाणा । गाळणें एक ॥ ९३७ ॥

हे चतुरा अर्जुना, पाणीं घुसळणें आणि दहीं घुसळणें, यात श्रम
सारखेच अथवा वाळू अथवा तीळ गाळण्याची खटपट सारखीच आहे.

आगा पाठीं लागतां घाइं । मरण न चुके चि पाहीं ।
तरि समोरिलां काई । आगळें कीजे ॥ ९३८ ॥

अरे, शत्रूला पाठ देऊन खाल्लेल्या घावांनीं जर मरण चुकतच नाहीं,
तर मग शत्रूच्या पुढें उभें राहून अधिक पराक्रम कां करूं नये ?

कुळस्त्री दांडेयांचे घाए । निगाली ही जरि साहे ।
तरि स्वपतितें वायें । सांडिलें कीं ॥ ९३९ ॥

कुलीन स्त्री नवऱ्याच्या जाचाला कंटाळून जर दुसऱ्याच्या घरी जाऊन तिथेही दांडक्याचे घाव सहन करते, तर मग स्वपतीला तिनें वृथाच सोडलें कीं !

तैसें आवडतें हिं करणें । न निफजे सीणलेयां हिं उणें ।
तरि विहित बा कोणें । बोलें भारी ॥ ९४० ॥

त्याप्रमाणें जें कर्म आवडतें, ते कर्म श्रमल्याशिवाय सिद्धीस जात नाहीं, तर मग विहित कर्म करणें कोणत्या शब्दांनी कठीण आहे असे म्हणावें ?

वरि थोडें चि अमृत घेतां । सर्वस्व वेचो कां पांडुसुता ।
जेणें जोडे जीविता । अक्षयत्व ॥ ९४१ ॥

हे पांडुसुता, ज्या अमृतसेवनानें अमरत्व प्राप्त होतें, त्याचा अल्पांश लाभण्याकरितां सर्वस्व कां खर्च करूं नये ?

एर काह्या मोलें पुरुनु । विष पियावें घेउनु ।
आत्महत्यासीं निमोनु । जाइजे जेणें ॥ ९४२ ॥

आणि ज्या विषाचे सेवन केलें असतां मरणच येणार, तर ते विष द्रव्य खर्च करून विकत घेऊन कशाला प्यावें ?

तैसिं जाचूनियां इंद्रियें । वेचौनियां आयुष्याचेनि दियें ।
सांचिलीं पापियें आन आहे । दुःख वांचौनि ॥ ९४३ ॥

त्याप्रमाणे इंद्रियांना कष्ट देऊन आणि आयुष्याचे दिवस भरीला घालून, पाप सांचविलें, तर त्यांत दुःखावांचून दुसरें काय आहे ?

ह्मणौनि करावा चि स्वधर्मु । जो करितां हीरौनि श्रमु ।
उचित देईल परमु । पुरुषार्थराजु ॥ ९४४ ॥

म्हणून स्वधर्माचे आचरणच करावे. त्यानेच जन्ममरण्याचे श्रम चुकतात व योग्य मोक्षरूपी श्रेष्ठ पुरुषार्थ प्राप्त होतो.

याकारणें किरीटी । स्वधर्माची राहाटी ।
न विसंबिजे संकटीं । सिद्धमंत्रु जैसा ॥ ९४५ ॥

या कारणास्तव, अर्जुना, जसें संकटांत सिद्धमंत्राला विसरूं नये, त्याप्रमाणें स्वकर्माच्या आचरणाला विसरूं नये;

कां नावेसि जैसें उदधी । महारोगीं दिव्योषधी ।
न विसंभिजे तेया बुद्धी । स्वकर्म एथ ॥ ९४६ ॥

अथवा समुद्रांत ज्या प्रमांणे नावेला विसरू नयें, किंवा महारोग्याने जसा दिव्यौषधीचा त्याग करू नये त्याप्रमाणे स्वकर्माचे आचरण करण्याचा निश्चय सोडू नये.

असक्तबुद्धीः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥

असक्तबुद्धिः, सर्वत्र, जितात्मा, विगतस्पृहः,
नैष्कर्म्यसिद्धिम्, परमाम्, संन्यासेन, अधिगच्छति

ज्याची बुद्धी कोठेंही आसक्त होत नाहीं, ज्यानें आपलें मन जिंकलें आहे, ज्याची इच्छा निःशेष नाहींशी झाली आहे असा मनुष्य संन्यासाच्या योगाने श्रेष्ठ अशा निष्कर्मतारूप सिद्धीला प्राप्त होतो.

मग इया चि गा कपिध्वजा । स्वकर्माचिया महापूजा ।
तोखला ईशु तमरजां । झाडि करुनि ॥ ९४७ ॥

मग, हे कपिध्वजा, याच स्वकर्मरूप महापूजेनें संतुष्ट झालेला परमेश्वर, साधकाच्या जीवनातील रजोगुण आणि तमोगुण या गुणांचा नाश करून,

सुधासत्वाचिया वाटा । आणि आपुली उत्कंठा ।
भवस्वर्गा कळकूटा । ऐसें दावी ॥ ९४८ ॥

साधकाला स्त्वगुणाच्या वाटेला लावतो आणि मग स्वर्गादी भोगसुद्धा
कालकूटा सारखे त्याज्य आहेत असें वाटाचयास लाविते.

जियें वैराग्य एणें बोलें । मागां संसिद्धी रूप केलें ।
किंबहुना तें आपुलें । मेळवी खागें ॥ ९४९ ॥

वैराग्य या शब्दाने मागे संसिद्धीचे निरूपण कले आहे,
त्या आपल्या मुक्कामाला ईश्वर त्या साधकास आणतो.

मग जींतलेयां हें भोए । पुरुषु सर्वत्र जैसा आहे ।
कां जाला ही जें लाहे । तें आतां सांघों ॥ ९५० ॥

ही वैराग्याची भूमी प्राप्त झाली म्हणजे तो पुरुषच कसा वागतो
आणि त्या स्थितीत त्याला काय लाभ होतो हे आता सांगतो.

तरि दाहीक हें संसारें । सर्वै मांडिलेंसे जें गुंपिरें ।
तेथ नांतुडें वागुरे । वारा जैसा ॥ ९५१ ॥

तर जसा, वारा पारध्याच्या जाळ्यांत सापडत नाही, त्याप्रमाणे तो साधक
हा जो देहादिक संसाररूपी पसरलेला गुंताडा आहे, त्यांत सापडत नाही.

पैं परिपाकाचिये वेळे । फळ देंटें ना देटु फळें ।
तैसें स्नेह खुळें । सर्वत्र होए ॥ ९५२ ॥

हे पहा पिकलेलें फळ जसें देंठाला धरीत नाहीं, किंवा देंठही त्याला धरीत
नाहीं, तद्वत् या परिपूर्ण अवस्थेंत त्याचें ममत्व सर्वत्र लुळे पडतें.

पुत्रवित्तकलत्र । हें जालेयां हिं स्वतंत्र ।
माझें न ह्मणे पात्र । विषाचें जैसें ॥ ९५३ ॥

जसे विष वाढलेले पात्र कोणी आपलें म्हणत नाहीं, त्याप्रमाणे पुत्र, द्रव्य व स्त्री
हीं आपल्या तंत्रानें वागत असलीं तरी ' ही माझीं आहेत ' असें म्हणत नाही.

ऐसा हे विषयजातीं । बुद्धि पोळिली जैसी माघुती ।
पाउलें घेंति एकांतीं । हृदइं चि रिगे ॥ ९५४ ॥

फार काय सांगावें ? ज्याप्रमाणे गरम पदार्थाचा चटका बसताच जसा मनुष्य हात
मागें घेतो, तशी त्याची बुद्धी विषयांपासून मागें परतून आत्मविचाराकडे लागते.

ऐसेया अंतष्करण । बाहियें येंतां तेयाची आण ।
न मोडी समर्था भेण । दासि जैसी ॥ ९५५ ॥

समर्थाची दासी ज्याप्रमाणें त्यानें घातलेली शपथ मोडीत नाहीं, त्याप्रमाणें
अंतःकरण हें इंद्रियद्वारा विषयांकडे न जाण्याविषयीं याची शपथ मोडीत नाही,

तैसी ऐक्याचिये मुठी । माझिवडें चित्त किरीटीं ।
करूनि वेधी निहटी । आत्मेयाचां ॥ ९५६ ॥

तसें अर्जुना, तो ऐक्यभावनेच्या मुठीत मनाला
आवळून तो आत्म्याच्या वेधाच्या दिशेनें प्रवृत्त करतो.

तेधवां दृष्टादृष्टस्पृहे । निमातें जालें चि आहे ।
आगि दडपिलेयां धूवें । न्हाइजे काई ॥ ९५७ ॥

तेव्हां राखेनें अग्नी दडपला असतां जसा धूर थांबतो, त्याप्रमाणे
ऐहिक व परलौकिक सुखाच्या आशा आपोआप नाहीशा होतात.

ह्मणौनि निर्मळे मानसिं । स्पृहा नाशौनि जाये आपैसी ।
किंबहूना तो ऐसी । भूमिका पावे ॥ ९५८ ॥

अर्थात मनावर नियंत्रण घातले की इच्छा नाश पावते,
व तो साधक अशा लक्षणांच्या अवस्थेला प्राप्त होतो.

पैं अन्यथाबोधु आघवा । मावळौनि तेया पांडवा ।
बोधमात्रीं चि जीवा । ठावो होऐ ॥ ९५९ ॥

अर्जुना, संपूर्ण विपरीत ज्ञान त्याचे नाहीसे होऊन केवळ
ज्ञानाच्या ठिकाणी याच्या अंतःकरणाचा निश्चय स्थिर होतो.

धारवणी वेचें सरे । तैसें भोगें प्राचीन पुरे ।
नवें तंव नुपकरे । काहिं चि करुं ॥ ९६० ॥

जसें सांचविलेलें पाणी रोज खर्च केलें म्हणजे तें संपते, तसें प्रारब्धकर्म हें भोगांतीं
सरतें; आणि नवीन कर्म बंधनकारक होईल असे तो काहीच करीत नाही.

तैसी कर्मसाम्यदशा । होये तेथ वीरेशा ।
श्रीगुरु आपैसा । भेटे चि गा ॥ ९६१ ॥

अरे वीरश्रेष्ठा अर्जुना, त्याची अशी कर्मसाम्य स्थिती
झाली की मग श्रीगुरूचीं आपोआप भेट होते

रातिची चौपाहारी । वेचलेयां अवधारीं ।
डोळेयां तमारि । मिळे जैसा ॥ ९६२ ॥

हे पहा रात्रीचे चार प्रहर संपले म्हणजे
अंधकाराचा नाश करणाऱ्या सूर्याचे दर्शन हाते.

कां एउनु फळाचा घडु । पारुखवी केळिचा वाढु ।
गुरु भेटौनि करी पाडु । मुमुक्षा तैसा ॥ ९६३ ॥

किंवा फळांचा घड येऊन जशी केळीची वाढ खुंटते, त्याप्रमाणे
श्रीगुरु येऊन जिज्ञासूची कर्मकर्तृत्वाची खटपट बंद करतात.

मग आळंगिला पूर्णिमा । उणीव सांडी चंद्रमा ।
तैसें होये वीरोत्तमा । गुरुकृपा तेया ॥ ९६४ ॥

मग पौर्णिमेनें चंद्राला आलिंगन दिलें, कीं चंद्र जसा उणेंपण
टाकतो, तसा सद्गुरूच्या कृपेनें तो पुरुषही परिपूर्ण होतो.

तेधवां अबोधमात्र असे । तें तंव तेया कृपा नासे ।
तेथ रात्रीसवें जाये आपैसें । आंधारें जैसें ॥ ९६५ ॥

मग जो कांही अज्ञानाचा अंश बाकी असेल, तो गुरुकृपेनें नाहींसा
होतो. जसा रात्री बरोबर ज्याप्रमाणे अंधार नाहीसा होतो,

तैसें अबोधनासासवें । नासे क्रियाजात आघवें ।
ऐसा समूळु संभवे । संन्यासु हा ॥ ९६६ ॥

त्याप्रमाणें अज्ञानाच्या नाशाबरोबर सर्व कर्ममात्र
नाश पावतें. अशा प्रकारे हा समूळ संन्यास घडतो.

एणें समूळज्ञानसंन्यासें । दृश्याचा ठाॐ जेथ पूसे ।
तेथ बुझावें तें आपैसें । तो चि आहे ॥ ९६७ ॥

या प्रमाणें सर्व कर्मास मूळ असलेल्या अज्ञानाच्या त्यागानें,
सर्व कर्मांचा नाश होतो. तो पुरुष स्वतःच ज्ञेयरूप होतो.

चेइलेयां वरि पाहिं । स्वप्नियां तिये डोहीं ।
आपणेयांतें काई । काढूं जाइजे ॥ ९६८ ॥

झोपेतून जागा झाल्यावर, स्वप्नात माणूस ज्या डोहात बुडत होता,
त्यातून आपल्याला बाहेर काढण्याविषयीं तो खटपट करील काय ?

तें मीं नेणें आतां जाणैन । हें सरलें तेया स्वप्न ।
जाला ज्ञातृज्ञेयाविहीन । चिदाकाश जो ॥ ९६९ ॥

तसेंच ' मला ज्ञान नाहीं, आतां मीं ज्ञान संपादन करीन, ' अशा प्रकारचें त्याचें
दुःखस्वप्न नष्ट होते, आणि ज्ञाता, ज्ञान ज्ञेय हे जाऊन तो केवळ ज्ञानमात्र होतो.

मुखाभासें आरिसा । परौता नेलेयां वीरेशा ।
पांतेपणेंविण जैसा । पांत ठाके ॥ ९७० ॥

हे वीरश्रेष्ठा अर्जुना, प्रतिबिंबासहित आरसा बाजूला नेला
असता, पहातेपणावांचूनच जसा पहाता एकटाच उरतो.

तैसें नेणणें जें गेलें । तेणें जाणणें हीं नेलें ।
मग निष्क्रिय उरलें । चिन्मात्र चि ॥ ९७१ ॥

त्या प्रमाणें अज्ञान जें गेलें, तेव्हां ते ज्ञानासही घेऊन
जाते, मग केवळ निष्क्रिय ज्ञान मात्र शिल्लक राहते.

तेथ स्वभावें धनंजया । नाहिं कोण्हीं चि क्रिया ।
ह्मणौनि प्रवादु तेया । निष्कर्म्य ऐसा ॥ ९७२ ॥

अर्जुना, त्या चैतन्याच्या ठिकाणी स्वभावतःच कोणतीही
क्रिया उरत नाही, म्हणून त्याला नैष्कर्म्य असे म्हणतात.

तें आपुलें आपणपें । असतू चि होउनि आरोपे ।
तरंगु कां वायुलोपें । समुद्र जैसा ॥ ९७३ ॥

वारा आणि तरंग लोपल्यावर समुद्र जसा आपल्या मूळ स्वरूपात येतो,
त्या प्रमाणें तें आपलें असलेले मुळचे स्वरूप आपल्याच ठिकाणीं उरतें.

तैसें न होणें निफजे । निष्कर्म्यसिद्धि ह्मणिजे ।
सर्वां हीं सिद्धी साहाजें । प्रेम हें चि ॥ ९७४ ॥

असें कोणतेंही  कर्म न हाणें, अशी जी स्थिती, त्या स्थितीला
नैष्कर्म्यसिद्धि म्हणतात, आणि हीच सिद्धी सर्व सिद्धींत श्रेष्ठ असते.

देउळिचिया कामा कळशु । परमु गंगे सिंधुप्रवेशु ।
कां सुवर्णशुद्धी कसु । सोळावां जैसा ॥ ९७५ ॥

देवळाच्या कामाला जशी कळस ही शेवटली मर्यादा आहे, किंवा गंगेने समुद्रात प्रवेश
केला म्हणजे पुढे तिचा प्रवाह बंद होतो, अथवा सोन्याचा चोखपणाचा जसा सोळावा कस,

तैसें आपुलें नेणणें । फेडिजे कां जाणणें ।
तें हिं गीळूनि जें असणें । ऐसी जे दशा ॥ ९७६ ॥

त्याप्रमाणे आपले अज्ञान ज्या ज्ञानाने नाहीसे केले
तेंव्हा तें ज्ञानही जेव्हां नाहींसें होईल अशी जी स्थिती

तियेपरौतें काहिं । निफजणें एथ नाहिं ।
ह्मणौनि ह्मणिपे पाहीं । परमसिद्धि ते ॥ ९७७ ॥

त्या नैष्कर्म्य स्थितीच्या पलीकडे या जगात जास्त निष्पन्न होण्यासारखी
कोणतीही स्थिती नाही, म्हणून हिला 'परमसिद्धी' हें नाव आहे.

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

सिद्धिम्, प्राप्तः, यथा, ब्रह्म, तथा, आप्नोति, निबोध, मे,
समासेन, एव, कौन्तेय, निष्ठा, ज्ञानस्य, या, परा

हें कौंतेया, ज्ञाननिष्ठेची योग्यता प्राप्त झाली आहे, त्याला
ब्रह्माची प्राप्ती कशी होते ते संक्षेपानें माझ्यापासून श्रवण कर.

परि हे चि आत्मसिद्धि । जो कोण भाग्यनिधि ।
श्रीगुरुकृपालब्धीं । काळिं पावे ॥ ९७८ ॥

गुरुकृपा होण्याच्या वेळीच ज्याचे भाग्य उदयास येते
त्या भाग्यवान पुरुषास ही आत्मसिद्धी प्राप्त होते,

उदैजतां दिनकरु । प्रकाशु आते आंधारु ।
कां दीपा संगें दीपाकारु । होये तंतु ॥ ९७९ ॥

ते लवणांची कणिका । मिळतखेंवों उदका ।
उदक चि होउनि देखां । ठाके जेवि ॥ ९८० ॥

कां निद्रितु चेवविलेयां । स्वप्नेंसीं नीदे वायां ।
जाउनि आपणपेयां । मिळे जैसा ॥ ९८१ ॥

तैसिं जियां कोण्हाचीं दैवें । गुरुवाक्यश्रवणां चि सवें ।
द्वैत गीळूनि विसंवे । आपणपेयां वृत्ति ॥ ९८२ ॥

तेयासि मग करणें । हें बोलिजैल चि कवणें ।
आकाशा एणें जाणें । होये काइ ॥ ९८३ ॥

ह्मणौनि तेयासि काहिं । त्रिशुद्धी करणें नाहिं ।
परि ऐसे हें जरि काहिं । नोहे जेया ॥ ९८४ ॥

कानावचनाचिये भेटी । सरिसा चि पैं किरीटी ।
वस्तु होउनि उठी । कव्हणी एकु जो ॥ ९८५ ॥

यऱ्हविं स्वकर्माचिया वन्ही । काम्यनिषेधाचां इंधनीं ।
रजतमें किर दोन्हीं । जाळिलीं आधीं ॥ ९८६ ॥

पुत्र वित्त परलोकु । ययां तिहींचा अभिलाखु ।
घरिं होये पाइकु । हें इं जालें ॥ ९८७ ॥

इंद्रिये सदा पदार्थीं । रिगतां विटाळलीं होंतीं ।
तिये प्रत्यहारतीर्थीं । नाहाणिलिं कीर ॥ ९८८ ॥

आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पौनि केवळ ।
घेउनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ९८९ ॥

सूर्य उगवतांक्षणींच अंधार जसा प्रकाशच होतो, कींवा
कापराला दिव्याचा स्पर्श होताच तो दिवाच होऊन जातो.

हें पहा, त्या मिठाचा खडा पाण्याला मिळाल्या
बरोबर ज्या प्रमाणें पाणीच होऊन राहतो;

अथवा झोपी गेलेला जागा झाला म्हणजे स्वप्नासह झोंप
नाहींशी होऊन, तो पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात येतो.

त्याप्रमाणें ज्या कोणाला दैवयोगानें गुरुवाक्याचे श्रवण घडते,
तेंव्हा द्वैत नाहीसे होऊन, वृत्ती आत्मस्वरूपीं स्थिर होते;

त्या ज्ञान्याला मग कर्म करण्याचे उरते असे कोण
म्हणेल ? आकाशाला कुठें यावें-जावें लागतें काय ?

म्हणून अशा पुरुषाला कांहींच कर्तव्य उरत नाहीं, हें निःसंदेह आहे.
परंतु असें जरी असलें, तरी हें असें त्याच्या बाबतीत घडत नाहीं,

अर्जुना, आपले कान व गुरुचें वचन यांची गांठ
पडतांक्षणींच, जो कोणी एक आत्मरूप होऊन जातो;

कारण सामान्यतः विहित कर्माचरणाच्या अग्नीनें काम्य व निषिद्ध कर्मांचीं
इंधने घालून, रज व तम हे गुण अगोदर जाळून टाकलेले असतात

पुत्र, द्रव्य, स्वर्गसुख, या तिहींच्या विषयींची इच्छा, चाकराप्रमांणे
त्याच्या अधीन होऊन राहिलेली असते. हीही गोष्ट घडून आली.

स्वैर धावणारीं इंद्रियें विषयांच्या ठायीं प्रवेश केल्यामुळें जीं विटाळलीं
होतीं, तीं ज्यानें प्रत्यहारतीर्थावर स्नान घालून पवित्र केलीं,

स्वधर्माचे आचरण करताना येणारे फळ ईश्वराला अर्पण करून
त्याच्या प्रसादानें अक्षय्य वैराग्यपद प्राप्त करून घेतले.

ऐसी आत्मसाक्षात्कारी । लाभे ज्ञानाची उजिरी ।
ते सामग्री किर पुरी । मेळविली ॥ ९९० ॥

अशा प्रकारें आत्मसाक्षात्काराच्या वेळीं ज्ञानाच्या उकर्ष
साधण्या करता त्याच्या प्राप्तीची सामग्री मिळविली,

आणि तिये चि समइं । सद्गुरु भेटले पाहीं ।
तेविं चि तिहीं । राहिजे ना ॥ ९९१ ॥

आणि त्याच वेळी सद्गुरु त्याला भेटतात आणि त्यांनीही
कांहीं संकोच न करतां स्पष्टपणें आत्मबोध सांगितला,

परि औषध घेंतखेंऊँ । काइ लाभे आपुला थाऊँ ।
किं उदैजतां चि दीऊँ । मध्यान होए ॥ ९९२ ॥

परंतु औषध घेताक्षणींच रोगाची निवृत्ती होऊन, काय आपलें
आरोग्य मिळतें ? त्याचप्रमाणें सूर्यादय होतांच काय मध्यान्ह होते ?

सुक्षेत्रिं आणि वोलटें । बिं पेरिलें गोमटें ।
परि अलोट फळ भेटें । परि वेळे पैं गा ॥ ९९३ ॥

ओल असलेल्या चांगल्या शेतांत, सकस बी पेरले तर अमाप
पीक मिळेल हे निश्चित. पण तेंही कांही कालानंतर मिळेल.

जोडला मार्गु प्रांजळु । मीनला सुसंगाचा मेळु ।
तरि पाविजे वांचौनि वेळु । लागे चि किं ॥ ९९४ ॥

चांगला मार्ग असून त्यांत चांगल्याची सोबतही मिळली, तेंव्हा आपण सहजच
इष्ट स्थळाला पोचतों, परंतु त्यासही कांहीं वेळ हा लागावयाचाच.

तैसा वैराग्यलाभु जाला । वरि सद्गुरु भेटला ।
जीवा अंकुरु फूटला । विवेकाचा ॥ ९९५ ॥

त्या प्रमाणें वैराग्याची प्राप्ती झाली, त्यांत सद्गुरूंचीही भेट झाली
व ज्ञानप्राप्ती करून घेण्याचीही अंतःकरणांत इच्छा झाली,

तेणें ब्रह्म एक आथि । एर आघवी चि भ्रांति ।
हे ही किर प्रतीति । गाढी केली ॥ ९९६ ॥

आणि या विवेकानें ब्रह्म हें एकच सत्यवस्तू आहे,
बाकीचे सर्व भ्रांती आहे, हाही अनुभव खरोखर दृढ केला.

परि तें चि जें परब्रह्म । सर्वात्म सर्वोत्तम ।
मोक्षाचें हीं काम । सरे जेथ ॥ ९९७ ॥

परंतु तेंच परब्रह्म, जें सर्वात्मक व सर्वश्रेष्ठ
आहे, व ज्याच्याठायीं मोक्षाचें कार्य समाप्त होतें,

इया तीन्हीं अवस्था पोटीं । जिरवि जें कां किरीटी ।
तेया ज्ञानासि ही मीठी । दे जे वस्तु ॥ ९९८ ॥

अर्जुना, जे ज्ञान आपल्या पोटांत जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही
अवस्था नाहींशा करते, व असे जे ज्ञान, तें ज्या ब्रह्माच्या ठिकाणीं लय पावतें;

ऐक्याचें ऐक्यपण सरे । जेथ अद्वयकणु हीं विरे ।
काहिं चि नुरौनि उरे । जें कांहिं गा ॥ ९९९ ॥

जेथें ऐक्याचा एकपणाही उरत नाहीं, व जेथें आनंदसुखाचा लेशही
उरत नाहीं आणि शेवटीं जें कांहीं नाहीं असें शून्यस्वरूप उरतें,

तिये ब्रह्मीं एकपणें । ब्रह्म चि होउनि असणें ।
तें काम चि वारुनि तेणें । पाविजे पैं ॥ १००० ॥

त्या ब्रह्मतत्त्वांत समरस होऊन ब्रह्मत्व पावणें,
ही स्थिती त्या साधकाला क्रमानेच प्राप्त होते.

भूकैलेयापासीं । ॐगरिलें षड्रसीं ।
तो तृप्ति ग्रासीं । लाहे जेंवि ॥ १००१ ॥

क्षुधितापुढें षड्रस अन्नाचें ताट वाढून ठेवले असता,
प्रत्येक घांसागणीक जसें त्याचें समधान होतें,

तैसा वैराग्याचा वोलाॐ । विचाराचा तो दिवा ।
आंबुथितां आत्मठेवा । काढी चि तो ॥ १००२ ॥

तद्वत् वैराग्याच्या आधारानें विवेकाचा दिवा उजळ होतांच
त्या, आत्मप्रकाशात हाच जणू ठेवा असतो त्याचा शोध घेतो

तरि भोगिजे आत्मरिद्धि । यवडी योग्यतेची सिद्धि ।
जेयां आंगिं निरवधि । लेणें जाली ॥ १००३ ॥

तर आत्मरूप ऐश्वर्य भोगण्याच्या योग्यतेची सिद्धी
ज्याच्या अंगावर कायमचा अलंकार होऊन राहिली आहे.

तो जेणें क्रमें ब्रह्म । होणें करी कां सुगम ।
तेया क्रमाचें आतां वर्म । आइक सांघों ॥ १००४ ॥

तो ज्या क्रमानें ब्रह्मप्राप्ती सुलभ करून
घेतो, त्या कर्माचें आतां वर्म सांगतों, ऐक.

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागव्देषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥

बुध्द्या, विशुध्दया, युक्तः, धृत्या, आत्मानम् नियम्य, च,
शब्दादीन्, विषयान्, त्यक्त्वा, रागव्देषौ, व्युदस्य, च

शुद्ध बुद्धी धारण करून धैर्याने आपल्या मनाचा निग्रह करून
शब्दादिक विषय टाकून देऊन, प्रीती व द्वेष नाहीसे करून टाकतो.

तरि गुरु दाविलेया । एउनि विवेकतीर्थतटा ।
धूनियां मळकटा । बुद्धिचा तेणें ॥ १००५ ॥

तर गुरूंनी दाखविलेल्या वाटेने विवेकरूपी तीर्थाच्या
कांठावर येऊन, तो बुद्धीचा मळ साफ धुऊन काढतो.

मग राहूनि उगळिली । प्रभा चंद्रें आळंगिली ।
तैसी शुद्धी ते जडली । आपणपां बुद्धि ॥ १००६ ॥

मग ज्याप्रमाणे राहूच्या ग्रासातून मुक्त झालेली चंद्राची प्रभा चंद्रास आलिंगन
देते, त्याप्रमाणें निर्मळ झालेली त्या पुरुषाची बुद्धी आत्मस्वरूपाला बिलगते.

सांडौनि कुळें दोन्हीं । क्रिया अनुसरे कामिनी ।
द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं । पडिली तैसी ॥ १००७ ॥

सासर व माहेर ह्या दोन्ही कुळांचा स्नेह टाकून, प्रिया जशी पतीस अनुसरते,
त्याप्रमाणें तशी बुद्धी ही द्वैतभावना सोडून आत्मचिंतनांतच रत होते.

आणि ज्ञान ऐसें जिव्हार । नेवों नेंति निरंतर ।
इंद्रियिं पीकेलें थोर । शब्दादिक जें ॥ १००८ ॥

आणि ज्ञानाचा जिव्हाळा लाभण्याच्या आशेने इंद्रियानीं
ज्या शब्दादिक पांच विषयांना थोरपणा दिला

तें रश्मिजाळ काढिलेयां । मृगजळ जाये ल्या ।
तैसें धृतिरोखें तेया । पांचां हिं केलें १००९ ॥

ते इंद्रीयांचे पाच विषय, सूर्यकिरण आवरल्यानें जसें मृगजळ लोपतें,
तसे धैर्यानें इंद्रियांचा रोध झाला म्हणजे आपोआप नाहींसे होतात.

नेणतां अधमाचें अन्न । खादलेयां कीजे वमन ।
तैसीं वोकविलीं सवासन । इंद्रियें विषयीं ॥ १०१० ॥

न समजतां भ्रष्टाच्या घरचें खाल्लेले अन्न ओकून टाकावें लागते,
त्याप्रमाणें इंद्रिये व त्यांची विषयवासना वांतीसारखीच त्यागतो.

मग प्रत्यक्प्रवृत्ति चोखटे । गंगेचेनि लाविलीं तटें ।
ऐसी प्रायश्चित्तें धोवटें । केलीं एणें ॥ १०११ ॥

मग हीं इंद्रियें अंतर्मुख वृत्तीच्या पवित्र तटावर आणून
ठेवलीं, या प्रमाणें या साधकांनें शुद्धिकारक प्रायश्चित्तें केलीं.

पाठिं सात्विकें धीरें तेणें । शोधारिलीं तिये करणें ।
मनेंसिं योगधारणें । मेळविलीं ॥ १०१२ ॥

नंतर स्वत्विक धैर्यानें तीं इंद्रियें शुद्ध केलीं, आणि मनासह
सात्विक धैर्याच्या जोरावर योगधारणेंला लाविलीं.

तेविं चि प्राचीन इष्टानिष्टें । भोगेंसिं येउनि भेटे ।
तेथ देखलेयां हिं वोखटें । द्वेषु न करी ॥ १०१३ ॥

त्याचप्रमाणें, पूर्व कर्मांच्या योगानें चांगलें किंवा वाईट भोग प्राप्त झाले
असतां त्या वेळीं वाईटाचा अनुभव आला तरी द्वेष करीत नाहीं;

ना गोमटें चि विपायें । तें आणूनि पुढां सुवे ।
तरि तेयालागि नोहे । साभिलाखु ॥ १०१४ ॥

अथवा सहज चांगला भोग भोगण्याचा समय आला असतां
तर त्या विषयाचा तो आपल्या मनांत अभिलाष धरीत नाहीं.

विविक्तसेवी लध्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥

विविक्तसेवी, लघ्वाशी, यत, वाक्, काय, मानसः,
ध्यानयोगपरः, नित्यम्, वैराग्यम्, समुपाश्रितः

जो एकांतवास करणारा, मिताहारी, वाणी शरीर व मन यांना स्वाधीन
ठेवणंरा, ध्यानयोगपर वैराग्याचा नित्य आश्रय केलेला, असा असतो.

इयापरीं इष्टानिष्टीं । रागद्वेष किरीटी ।
त्यजूनि गिरिकपाटीं । निकुंजीं वसे ॥ १०१५ ॥

अर्जुना, याप्रमाणें इष्ट आणि अनिष्ट यांच्या विषयीं द्वेष सोडून
देऊन, तो मग पर्वताचे गुहेंत अथवा निरंजन वनांत वास करतो;

गजबज सांडिलिया । वसवी वनस्थळिया ।
आंगाचिया मांदिया । एकलिया ॥ १०१६ ॥

लोकांनी गजबजलेले ठिकाण सोडून केवळ एकट्या शरीराचे अवयव
हेंच तेथें त्याचे सोबती असतात अशा वनस्थळीं तो जाऊन राहतो,

शमदमादिकिं खेळे । न बोलणेनि चावळे ।
गुरुवाक्याचेनि मेळें नेणे वेळु ॥ १०१७ ॥

इंद्रियें व मन यांचा निग्रह हीच त्याची क्रीडा, मौंन हेंच त्याचें बोलणें;
गुरुवचनांवर चिंतन करण्यात त्याला वेळेचे भान राहत नाही.

अणि आंगा बळ यावें । नातरि क्षुधा जावें ।
कां जीभेचे पुरवावे । मनोरथ ॥ १०१८ ॥

आणि आपले अंगांत शक्ती यावी, अथवा भूक
निवावी अथवा जिव्हेच्या इच्छा पुरवाव्यात;

भोजन करितांविषीं । यां तिहींतें हीं न लेखी ।
आहारिं मीति संतोषीं । माप सुये ॥ १०१९ ॥

भोजन करतेवेळीं या तिन्ही गोष्टीकडे तो लक्ष देत नाही,
आहाराविषयीं तो अल्पसंतुष्ट असतो, मोजमाप ठेवीत नाहीं,

आसनाचेनि पावकें । हुरपतां प्राणु पोखें ।
येया चि लागि मोटकें । अशन करी ॥ १०२० ॥

खाल्लेल्या अन्नाच्या उष्णतेनें खंगलेला प्राण
वांचेल, इतक्याच बेतानें अन्न सेवन करतो

आणि परपुरुषें कामिली । कुळवधू आंग न घली ।
निद्रालस्य न मेकळी । आसन तैसें ॥ १०२१ ॥

आणि परपुरुषाने इच्छा केली असतां जशी कुलवान् स्त्री आपले शरीर त्याच्या स्वाधीन
करीत नाहीं, तसा तो झोप किंवा आळस यामुळे आसन विचलित होऊ देत नाही.

दंडवताचेनि प्रसंगें । भुइं हान आंग लागे ।
वांचौनि एर नेघे । राभस्य जेथें ॥ १०२२ ॥

देवाला साष्टांग नमस्कार करण्याच्या वेळीं काय तें अंग जमिनीला लागतें,
त्या व्यतिरिक्त अविचाराने जमिनीवर निद्रेकरितां अंग टाकीत नाहीं;

देहनिर्वाहापुरतें । राहाटवी हातपायांतें ।
किंबहुना आपैतें । सबाह्य केलें ॥ १०२३ ॥

देहाचे धर्म पार पाडण्यापुरते हातापायांना काम देतो, अशा
प्रकारे त्यानें अंतर्बाह्य शरीर आपल्या आधीन केलें आहे.

आणि मनाचा उंबरा । वृत्तीसि देखों नेदी वीरा ।
तेथ कें वाग्व्यापारा । अवकाशु असे ॥ १०२४ ॥

आणि अर्जुना, जो आपल्या वृत्तीला मनाचा उंबरठाही पाहूं देत नाही, अशा
स्थितींत मनांतले विचार शब्दांनीं उच्चारण्याला अवकाश तरी कोठें उरतो ?

ऐसेन देह वाचा मानस । हें जीणौनि बाह्य प्रदेश ।
आकोळिलें आकाश । ध्यानाचें तेणें ॥ १०२५ ॥

अशा प्रकारें शरीर, वाणी व मन ही बाहेरची ठिकाणे जिंकून
त्याने ध्यानाचें आकाश आपल्या अधीन करून घेतलें.

गुरुवाक्यें उटिला । बोधाचा निश्चयो आपुला ।
नेहाळीं हातीं घेतला । आरिसा जैसा ॥ १०२६ ॥

सद्गुरूच्या वाक्याने जागा झालेला आत्मबोधाविषयींचा आपला
निश्चय तो निरंतर अरशासारखा पुढें धरून त्याला निहाळीत असतो.

पैं ध्याता आपणपें चि परी । ध्यानरूपें वृतीमाझारि ।
ध्येयत्वें हे अवधारीं । ध्यानरूढि गा ॥ १०२७ ॥

अर्जुना, ऐक, ध्यान करणारा आपल्यालाच, ध्यानरूप झालेल्या
वृत्तीमध्ये, ध्येयपणाने घेतो. ही ध्यान करण्याची प्रसिद्ध रीत आहे.

तेथ ध्यान ध्येय ध्याता । यां तिहिं एकरूपता ।
होये तंव पांडुसुता । कीजे तें गा ॥ १०२८ ॥

हे पांडुसुता, त्या ठिकाणी ध्येय, ध्यान व ध्याता ही त्रिपुटी
विसरून या तिहींची एकरूपता होईपर्यंत तें ध्यान करावें.

ह्मणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानीं जाला दक्षु ।
परि पुढां सूनि पक्षु । योगाभ्यासाचा ॥ १०२९ ॥

म्हणून तो मुमुक्षू आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेण्याकरितां तत्पर झाला;
पण हें सर्व त्याला योगाभ्यासाचा पक्ष पुढें केल्यामुळे साधते.

अपानरंध्रद्वया- । माझारि धनंजया ।
पारष्णी पीडूनियां । कांवरूमूळा ॥ १०३० ॥

गुदद्वार व मूत्रद्वार या दोहोंमध्यंतरींची शिवण
पायाच्या टाचेने दाबून तो मूळबंध बांधतो.

आकुंचूनु अध । देउनि तीन्हीं बंध ।
करूनि एकवद शुद्ध । वायुभेद ॥ १०३१ ॥

गुदाच्या स्नायूंचे अकुंचन करून मूलबंध, उड्डियान बंध व जालंधर बंध असे
तीन योगबंध साधून आणि प्राणापनादी वायूंनां तो एकवट करून सोडतो.

कुंडलिणी जागौनि । मध्यमा विकासौनि ।
आधारादि भेदुनि । आज्ञावेऱ्हीं ॥ १०३२ ॥

कुंडलिनी जागी करून, सुषुम्ना नाडीचा विकास करून आणि
आधार चक्रापासून आज्ञाचक्रापर्यंत प्राणभेद करून उर्ध्व जातो.

सहस्त्रदळाचा मेघु । पीयूखु वरिखौनि चांगु ।
तो मूळवेऱ्हीं ॲघु । आणूनियां ॥ १०३३ ॥

मग ब्रह्मरंध्रांतील सहस्त्रदलकमलरूपी मेघापासून
अमृतवृष्टी होते, तो अमृतप्रवाह मूलाधारापर्यंत आणून,

नाचतेया पुण्यगिरि । चिद्भैरवाचां खापरीं ।
मनपावनाचां खीचु करी । वाढूनियां ॥ १०३४ ॥

आणि ब्रह्मरंध्राच्या कैलासावर तांडव करणाऱ्या चैतन्यरूपी
भैरवाच्या भिक्षापात्रात मन व प्राण यांची ऐक्यरूपी खिचडी वाढून,

जालेयां योगाचा गाढा । मेळावा सूनि हा पुढां ।
ध्याना मागिली कडां । स्वयंभ केलें ॥ १०३५ ॥

हा योगाभ्यास चांगला दृढावल्यावर मन हा तीन बंधाचा समुदाय पुढें करून,
मागल्या बाजूस ब्रह्मस्वरूपाचें ध्यानाचें ठाणे मजबूत व ठाम करतो.

आणि ध्यानयोग दोन्हीं । इयें आत्मतत्वज्ञानीं ।
पैठिं होआवेया निर्विघ्नीं । आदीं चि तेणें ॥ १०३६ ॥

आणखी, ध्यान व योग हे दोन्ही निर्विघ्नपणें आत्मतत्त्वाच्या
ज्ञानात प्राप्त होण्याकरीतां त्यानें अगोदरच

वीतराग तेयासारिखा । जोडूनि ठेविला सखा ।
तो आघविया चि भूमिका । सवें चाले ॥ १०३७ ॥

वैराग्यासारखा मित्र जोडून ठेवलेला असतो, तो आरंभापासून
तों ब्रह्मप्राप्तीपर्यंत त्याला सदोदित साथ देतो.

पांवें तें दीसे तंववेऱ्हीं । दीठितें न संडी दीपु जरि ।
तरि कें असे अवसरी । देखावेया ॥ १०३८ ॥

पाहावयाची वस्तू दिसेपर्यंत डोळ्यांना दिवा सोबत करीतच
राहील, तर ती वस्तू दिसायला वेळ कोठे लागेल ?

तैसें माक्षीं प्रवर्त्तलेयां । वृत्ति ब्रह्मीं जाये लया ।
तंव वैराग्य आथि तेया । भंगु कैंचा ॥ १०३९ ॥

त्याप्रमाणें, मोक्षप्राप्ती व्हावी म्हणून प्रवृत्त झालेल्या पुरुषाची वृत्ती ब्रह्माच्या ठिकाणी लय
पावेपर्यंत त्याच्याबरोबर वैराग्य आहे, मग त्याच्या मोक्षप्राप्तीचा भंग कसा होईल ?

ह्मणौनि सवैराग्यु । ज्ञानाभ्यासु तो सभाग्यु ।
करूनि जाला योग्यु आत्मलाभा ॥ १०४० ॥

म्हणून वैराग्यासह जो ज्ञानाचा अभ्यास करतो तोच
पुरुष, आत्मप्राप्तीला योग्य होतो तोच भाग्यवान होय.

ऐसी वैराग्याची आंगीं । बाणूनियां वज्रांगी ।
राजयोगुतुरंगी । आरूढला ॥ १०४१ ॥

या प्रमाणें वैराग्याचे अभेद्य कवच अंगावर
घालून तो राजयोगरूपी घोड्यावर स्वार झाला.

वरिपडिलें दीठी । सानें थोर ही निवटी ।
ते बळी विवेकमूठी । ध्यानांचें खांडें ॥ १०४२ ॥

वाटेंत लहानमोठें जें दृष्टीस पडेल, त्याचें निवारण करण्याकरितां
त्याने विवेकाच्या बळकट मुठीत ध्यानरूप तलवार धारण केली.

ऐसेनि संसाररणाआंतु । आंधारीं सूर्यु तैसा असे जांतु ।
मोक्षविजयश्रिये वरैतु । होआवेया ॥ १०४३ ॥

आणि अशा प्रकारें, सूर्य जसा अंधारांत निःशंकपणें शिरतो, तसा हा
साधक संसाराच्या रणात मोक्षरूपी विजयश्रीला वरण्यास निघाला.

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥

अहंकारम्, बलम्, दर्पम्, कामम्, क्रोधम्, परिग्रहम्,
विमुच्य, निर्ममः, शान्तः, ब्रह्मभूयाय, कल्पते

अहंकार, बल, दर्प काम, क्रोध व परिग्रह टाकून देतो, व ममता
टाकून देऊन जो शांत होतो, तोच ब्रह्मरूप होण्यास योग्य होतो.

तेथ आडवैरें चि आले । दोषवैरी जे धोपटिले ।
तेयांमाझि पहिलें । देहीं अहंकारु ॥ १०४४ ॥

त्या ठिकाणीं प्रतिबंध करण्याकरिता आलेले जे दोषरूपी वैरी
त्याने चांगलें पिटून काढले, त्यांत पहिला होता देहाहंकार.

जो न मोकळी मारुनि । जिवों नेंदि उपजौनि ।
विचंबी खोडां घालुनि । हाडाचां इये ॥ १०४५ ॥

जो अहंकार मनुष्याला मारून सोडीत नाहीं, व जन्मल्यावरही
सुखाने जगू देत नाही; हाडांच्या खोड्यांत घालून कुचंबत ठेवतो.

तेयाचा देह हा थारा । मोडूनि घेतला वीरा ।
आणि बळ हा दुसरा । मारिला वैरी ॥ १०४६ ॥

त्या या अहंकाराचा देहदुर्ग हाच मुख्य आधार आहे, त्याचा पाडाव
करून त्यानें तो काबीज केला. आणि बल हा दुसरा शत्रू मारला.

जें विषयांचेनि नावें । चौगुणें हीं परि ठावें ।
जीणें मृतावस्था धांवे । सर्वत्र जगा ॥ १०४७ ॥

विषयांचे नाव घेताच जो चौपटीहूनही अधिक वाढतो
व ज्याच्या योगानें सर्व जगाला मृतावस्था प्राप्त होते.

तो विषयविषिचा थावो । आघवेयां दोषांचा रावो ।
ध्यानखड्गाचा घाऊँ । साहील कैंचा ॥ १०४८ ॥

हा शत्रू म्हणजे विषयरूपी विषांनी भरलेला डोह, सर्वच दोषांचा राजा
आहे, परंतु तो ध्यानरूपी तरवारीचा घाव कसा सहन करणार ?

आणि प्रियप्राप्ती । करी जेया सुखाची व्यक्ती ।
तेयाची घालूनि बूंथि । आंगीं जो वाजे ॥ १०४९ ॥

आणि प्रिय विषयांची प्राप्ती झाली असतां ज्याला परम आंनद
होतो व त्यांचाच बुरखा घेऊन जो गर्जना करावयास लावतो,

जो सन्मार्ग भुलवी । मग अधर्माचां अडवीं ।
सूनि वाघां सांपडवी । नरकादिकां ॥ १०५० ॥

जो सन्मार्गाचा विसर पाडतो, व अधर्माच्या रानांत
घालून नरकरूपी हिंस्त्र वाघाच्या तडाख्यात टाकतो.

तो विश्वासें मारितां रिपु । निपटूनि घातला दर्पु ।
आणि जेयाचा आहा कंपु । तापसांसि ॥ १०५१ ॥

अस्सा जो विश्वासघातकी ' गर्वरूप ' शत्रू, तो मारून टाकतो,
आणि ज्याचा मोठमोठ्या तपस्व्यांनाही दरारा वाटतो;

क्रोधा ऐसा हा महादोखु । देख पां जेयाचा परिपाकु ।
भरिजे तंव अधिकु । रिता होये जो ॥ १०५२ ॥

क्रोधासारखा महादोष हाच ज्याचा परमोत्कर्ष आहे,
आणि ज्याला भोग दिला असतां तो अतिशय वाढतो

तो कामु कोण्हीं चि ठांइं । नसे ऐसें केलें पाहिं ।
किं तें चि क्रोधा ही । साहाजें जालें ॥ १०५३ ॥

तो काम हा शत्रू, त्याला हा मुमुक्षू नष्ट करून टाकतो,
आणि मग त्यामुळेंच क्रोधाचाही नायनाट आपोआप होतो.

मूळाचें तोडणें जैसें । होये कां शाखादोसें ।
कामें नासिलेनि नासे । तैसा क्रोधु ॥ १०५४ ॥

जसें मूळ तोडण्याने शाखा तोडण्यासारखें होतें,
तसा कामाचा नाश केल्यावर क्रोधही नाश पावतो.

ह्मणौनि कामु वैरी । जाला जेथ ठाणौरी ।
तेथ सरली वारी । क्रोधाची ही ॥ १०५५ ॥

म्हणून कामरूपी शत्रू जेव्हां या लढाईत मारला गेला
तेव्हांच क्रोधाची येण्याजाण्याची वारीही संपली.

समर्थु आपुला खोडा । सीसें वाहावी जैसा होडा ।
तैसा भुंजौनि गाढा । परिग्रहो ॥ १०५६ ॥

आणि राजा ज्याला खोडा घालतो त्यालाच तो वाहून नेण्यास लावतो,
त्याप्रमाणें परिग्रहाचा स्वीकार केला असतां तो बलवत्तर होतो.

जो माथा चि पालाणवी । आंगा आवगुण घालवी ।
ममत्वाची घेववी । जिये दांडी ॥ १०५७ ॥

तो आपले खोगीर जीवाच्या मस्तकावर ठेऊन अंगांत अवगुणांचा
प्रवेश करवितो, आणि जीवाला ममतेची काठी धरायला लावतो,

शिष्यशास्त्रादिविलासें । मठामुद्राचेनि मीसें ।
घातले आहाति पांसे । निसंगां जेणें ॥ १०५८ ॥

ज्या परिग्रहाने शिष्य व शास्त्रादिकांचा बडिवार वाढवून आणि मठ,
मुद्रा, इत्यादिकांचीं सोंगे सजवून, निःसंग साधूनाही पाशात घातलें आहे.

घरीं कुटुंबपणें सरे । तरि वनीं वनत्वें अवतरे ।
नागिवेया ही शरीरें । लागला आहे ॥ १०५९ ॥

घरी कुटुंबाच्या रूपाने तो परिग्रह समाप्त झाला तरी रानांत जो
वन्यरूपानें पुन्हा प्रगट होतो. जो नागव्या शरीरालाही सुटत नाहीं.

ऐसा दुर्जयो परिग्रहो । तेयाचा फेडूनि ठाऊँ ।
भवविजयाचा उत्साहो । भोगीतु असे तो ॥ १०६० ॥

जिंकण्याला कठीण असलेला असा जो परिग्रह, त्याचे उच्चाटन करून
हा मुमुक्षू, संसारावर विजय संपादिल्याचा आनंद भोगीत असतो,

तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे ।
ते कैवल्यदेशिचे । राय जैसे आले ॥ १०६१ ॥

त्यावेळी अमानित्वादी सर्व ज्ञानगुणांचे समुदाय हेच जणूंकाय मोक्षदेशाचे राजे असावेत, तसे उपस्थित झाले.

नव्हे सम्यग्ज्ञानाचिया । राणिवा उगाणूनि तेया ।
परिवारु होउनियां । राहांति आपण ॥ १०६२ ॥

तेव्हा त्यांनी यथार्थ ज्ञानाचें राज्य त्याला अर्पण करून ते आपण सर्वजण त्याचा परिवार होऊन ते त्याचे बरोबर राहूं लागले.

प्रवृत्तीचिये राजबीदी । अवस्थाभेदप्रमदीं ।
कीजताये प्रतिपदीं । सुखाचें लोण ॥ १०६३ ॥

प्रवृत्तिरूपी राजबिंदीमध्यें जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही प्रमदांनीं आपल्या सुखाचे निंबलोण पावलोपावली त्यावरून उतरविलें.

पुढां बोधाचिये कांबिवेऱ्हीं । विवेकु दृश्याची मांदी सारी ।
योगभूमि आरती करी । यंति जैसिया ॥ १०६४ ॥

त्या साधकाच्या पुढें विवेक हा जणूं चोपदार बनून, बोधरूपी काठीनें दृश्याची गर्दी दूर करतो, आणि योगावस्था त्याला पंचारती घेऊन ओंवळण्यास येतात.

तेथ रिद्धीसिद्धीचीं अनेंके । वृंदें मिळतें प्रसंगें ।
तिये पुष्पवर्षीं आंगें । नाहांतसे तो ॥ १०६५ ॥

तेव्हां त्याप्रसंगी ऋद्धिसिद्धींचे अनेक समुदाय येतात, आणि त्यांनीं केलेल्या पुष्पवृष्टींनीं त्या शिलेदाराला आंघोळ होते.

ऐसें ब्रह्मैक्यासारिखें । स्वराज्य यंतां जवळिके ।
झळंबित आहे हरिखें । तीन्ही लोक ॥ १०६६ ॥

अशा प्रकारें ब्रह्मैक्याचें स्वराज्य जवळ येऊन ठेपल्यामुळे तो साधक तिन्ही लोक आनंदानें भरून टाकीत आहे.

तेधवां वैरी कां मैत्रिया । तेयासि माझें ह्मणावेया ।
सन्माना धनंजया । उरे चि ना ॥ १०६७ ॥

त्यावेळी अर्जुना, हा आपला वैरी आहे, किंवा हा आपला मित्र आहे असें म्हणावयास त्यास समानता उरतच नाही.

हें ना भलेतेणें व्याजें । जो जेयातें ह्मणे माझें ।
तें नोडवे चि मां दूजें । अद्वितीयु जाला ॥ १०६८ ॥

इतकेंच नाही, तर जो ज्याला ' माझे ' असें म्हणेल, तेव्हढेही दुजेपण तेथे राहत नाही कारण तो स्वतःच अद्वैतस्वरूप झालेला असतो.

पैं आपुलिया एकी सत्ता । सर्वें कवळूनि पांडुसुता ।
कहिं न लगती ममता । धाडिली तेणें ॥ १०६९ ॥

अर्जुना, याप्रमाणें तो केवळ एकभावानें हें सर्व विश्व व्यापतो, आणि म्हणून त्याला ममता कधींच जडत नाहीं, तो तिचा सर्वस्वीं त्याग करतो.

ऐसा जींतलेयां रिपुवर्गु । आपु मानलेयां हा जगु ।
आपैसेया योगतुरंगु । थीरु जाला ॥ १०७० ॥

या प्रमाणें शत्रुसमुदाय जिंकल्यावर, व हें सर्व विश्व आपलेसे केल्यावर, त्याचा योगरूपी घोडा आपोआपच स्थिर होातो.

वैराग्याचें गाढलें । आंगीं त्राण होंतें उभलें ।
तें हिं नावेक ढिलें । केलें तेधवां ॥ १०७१ ॥

आणि वैराग्याचें चिलखत अंगावर घट्ट चढविलें होतें, तेंही तो त्या वेळीं क्षणभर सैल करतो.

आणि लोटी ध्यानाचें खांडें । तें दूजें नाहिं फुडें ।
ह्मणौनि हातु आखुडे । वृत्तिचा ही ॥ १०७२ ॥

आणि ज्या द्वैताला ध्यानरूपी तरवार मारील, असे दुसरे समोर काहींच नसल्यामुळें, ध्यानवृत्तीच्या हातालाही हिसडा बसतो.

जैसें रसौषध खरें । आपुलें काज करूनि पुरें ।
आपण हिं उतरे । तैसें होंतें ॥ १०७३ ॥

ज्याप्रमाणे खरे रसायन आपले कार्य पूर्ण करून शरीरातून नाहींसें होतें. तसाच प्रकार येथेंही घडून येतो.

देखौनि टाकिता ठावो । धांवतां थिरावे पाउँ ।
तैसा ब्रह्मसामीप्यें थांवों । अभ्यासु सांडी ॥ १०७४ ॥

मुक्काम जवळ आल्यावर धांवणाऱ्या पायांची गती मंदावते, त्या प्रमाणें ब्रह्मप्राप्ती जवळ आली आहे असें जाणून अभ्यासाचा वेगही मंदावतो.

घडतां महोदधीसीं । गंगा वेगें सांडिजे जैसी ।
कां कामिनी कंथापासीं । मंथर होए ॥ १०७५ ॥

समुद्राला मिळताच नदीचा वेग जसा मंदावतो, किंवा कामिनी स्त्री पती भेटला म्हणजे जशी शांत हाते.

नाना फळतिए वेळे । केळिची वाढि मांडुळे ।
कां गावांपुढें वाळे । मार्गु जैसा ॥ १०७६ ॥

अथवा केळीला फळांचा घड आला असता, तिची वाढ मंदावते. किंवा गांव येतांच ज्याप्रमाणें रस्ता वळतो व संपतो,

तैसा आत्मसाक्षात्कारु । होइल देखों गोचरु ।
ऐसा साधनहातियेरु । खलु चि ठेवी ॥ १०७७ ॥

त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार प्राप्त होईल असे दृष्टीस पडतांच, तो साधनांचीं सर्व हत्यारें हळूहळू खालीं ठेवतो.

ह्मणौनि ब्रह्मेंसिं तेया । ऐक्याचा समयो धनंजया ।
होंतसे तैं उपाया । ओहटु पडिला ॥ १०७८ ॥

म्हणून अर्जुना, ब्रम्हाशी ऐक्य होण्याच्यावेळी त्याच्या साधनोपायांना आस्ते आस्ते ओहटी लागते,

मग वैराग्याची गोधुळुक । जें ज्ञानअभ्यासाचें वार्द्धक ।
योगफळाची ही परिपाक- । दशा जे कां ॥ १०७९ ॥

मग वैराग्याची जी सांज वेळ आहे, व ज्ञानाभ्यासाचे जें वार्धक्य, अथवा योगाच्या फळाची जी परिपक्व दशा,

ते शांति पैं गा सुभगा । संपूर्ण ये तेयाचिया आंगा ।
तैं ब्रह्म होआवेया जोगा । होये तो पुरुष ॥ १०८० ॥

अशी जी शान्ती, ती, अर्जुना, त्याचे ठिकाणी संपूर्ण प्राप्त होते, असें झालें म्हणजे तो पुरुष ब्रह्मरूप होण्यास पात्र होतो.

पुनिवेहून चाउदसीं । जेतुलें उणेपण शशी ।
कां सोळें पाहूनि जैसी । पन्हारावी वानी ॥ १०८१ ॥

पौर्णिमेपेक्षा चतुर्दशीला चंद्राच्या कलेंत जितका उणेपणा असतो, किंवा सोळा कसाच्या सोन्यापेक्षा पंधरावा कस जितका हीण असतो,

सागरीं ही पाणि वेगें । संचरे तें रूप गंगे ।
येर निश्चळ जें उगें । तें समुद्रु जैसा ॥ १०८२ ॥

समुद्रामध्यें गंगेचे पाणी जात असतें, तें जसे गंगेचें स्वरूप असतें, पण बाकीचें पाणी जसें समुद्राचेंच स्वरूप असतें;

ब्रह्म आणि ब्रह्महोंतिये । योग्यते तैसा पाडु आहे ।
तें चि शांतिचेनि लाहें । होतें तो गा ॥ १०८३ ॥

ब्रह्म आणि ब्रह्म होणारा, यांच्या योग्यतेमध्यें तसें अंतर आहे, शांतीच्या योगानें तो पुरुष तेंच ब्रह्म त्वरित होतो.

पैं तें चि होणेनविण । प्रतीती आलें ब्रह्मपण ।
ते ब्रह्म होती जाण । योग्यता एथ ॥ १०८४ ॥

पण प्रत्यक्ष ब्रह्मरूप होण्याआधी जें ब्रह्मपण अनुभवास आलेलें असतें, त्याच अनुभवाला ' ब्रह्मस्वरूप होण्याची पात्रता ' असें म्हणतात.

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥

ब्रह्मभूतः, प्रसन्नात्मा, न, शोचति, न, कांक्षति,
समः, सर्वेषु, भुतेषू, मद्भक्तिम्, लभते, पराम्

ब्रह्मरूप झालेला पुरुष शोक करीत नाही, आणि इच्छाही करीत नाहीं, तर सर्व भूतांच्या ठिकाणी समबुद्धी ठेऊन, माझी श्रेष्ठ भक्ती प्राप्त करून घेतो.

ते ब्रह्मभावयोग्यता । पुरुष मग तो पांडुसुता ।
आत्मबोधप्रसन्नता- । पदीं बैसे ॥ १०८५ ॥

मग, अर्जुना, ही ब्रह्मरूप होण्याची पात्रता प्राप्त झालेला मनुष्य ब्रह्मबोधानें येणाऱ्या आत्मबोध प्रसन्नतेच्या पदावर बसतो.

जेणें निफजे रससोए । तो तापु ही जैं जाए ।
तैं ते कां होए । प्रसन्न जैसी ॥ १०८६ ॥

ज्या अग्नीच्या योगें स्वयंपाक तयार होतो, व जेव्हां ती उष्णता देखील अन्नातून जाते, तेव्हांच जसें तें अन्न खाण्यास समाधानकारक होतें;

नाना भरतिया लगबगा । शरत्कालिं सांडिजे गंगा ।
कां गीत राहातां उपांगा । उँहटु पडे ॥ १०८७ ॥

अथवा शरद् ऋतूमध्ये गंगेची लगबग जाऊन गंगा स्थिर होते; अथवा गाणें थांबलें असतां साथीची वाद्येही जशी मूक होतात.

तैसा आत्मबोधीं उद्यमु । करितां होये जो श्रमु ।
तो ही जेथ । होउनि जाए ॥ १०८८ ॥

त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी जे तप, जे श्रम, जो अभ्यास तेही जेथे शांत होतात,

आत्मबोधप्रशस्ती । हे तिये दशेची क्षिति ।
ते भोगितसे महामती । योग्यु तो गा ॥ १०८९ ॥

आत्मबोधप्रसन्नता किंवा स्यानंद या नावानें त्या अवस्थेची प्रसिद्धी आहे, हे महामती अर्जुना, ती अवस्था तो अनुभवत असतो.

तेधवां अप्राप्तें शोचावें । काहिं कामावेया कामावें ।
हें सरलें समभावें । भरतेया तेया ॥ १०९० ॥

तेव्हां ब्रह्मसाम्याची भरती आल्यामुळें, त्या वेळी अमुक एक वस्तू दुरावली याचा शोक नसतो कांहीं प्राप्त व्हावें, म्हणून कामना धरावी हेही उरत नाही.

उदया यंतां गभस्ती । नानानक्षत्रव्यक्ती ।
हारविजति दीप्ती । आंगिका जेवि ॥ १०९१ ॥

सूर्य उदयाला आला म्हणजे नानाविध नक्षत्रे जशी आपल्या अंगची प्रभा हरवून बसतात.

तेवि उठितिया आत्मप्रथा । हे भूतभेदव्यवस्था ।
मोडितमोडितां पार्था । वास पाए तो ॥ १०९२ ॥

त्या प्रमाणें आत्मानुभवाचा उदय होतांक्षणीच, नाना भूतमात्रांचे
भेद दूर करी करीत तो आपल्या स्वरूपाला पाहातो.

पाटेया वरिलें आखरें । जैसिं पूसतें यति करें ।
तैसीं हरपति भेदांतरें । तेयाचिया दीठी ॥ १०९३ ॥

पाटीवरील अक्षरें जशी हातानें पुसता येतात, तसे
त्याच्या दृष्टीनें हे सर्व भेदभाव नाहीसें होतात.

ऐसेनि अन्यथाज्ञानें । जियें घेपति जागरस्वप्नें ।
तियें दोन्हीं केलीं लीनें । अव्यक्तामाझि ॥ १०९४ ॥

त्याप्रमाणे ज्या अन्यथा ज्ञानाकडून जागृती व स्वप्न ह्या अवस्था
उत्पन्न होतात, ती दोन्ही ज्ञानें अज्ञानामध्ये विलीन होतात.

मग तें हिं अव्यक्त । बोधु वाढतां झिजत ।
पूर्णबोधीं समस्त । बुडौनि जाए ॥ १०९५ ॥

मग तेही मूळ अज्ञान जसा जसा बोध वाढत जाईल तसे
तसे स्वसंवेद्य आत्मरूपाच्या बोधावस्थेत बुडून जाते.

नाना चालिचिया वाढी । वाट होंत थोडी ।
पातलां ठांइं बुडी । देउनि रिगे ॥ १०९६ ॥

किंवा चालणे जसजसे वाढत जाते तसतशी वाट संपत जातें,
आणि उद्दिष्ट ठिकाणी पोहोचल्यावर वाट चालण्याचे सरते.

जैसी भोजनव्यापारीं । क्षुधा जिरत अवधारीं ।
तृप्तीचां अवसरीं । नाहिं होए ॥ १०९७ ॥

भोजन चालले असतां जशी प्रत्येक घांसाबरोबर भूक हळूहळू
कमी होते, आणि पूर्ण तृप्ती झाली कीं भूक नाहीशीच होते.

कां जागृति जंव उद्दीपे । तंव तंव नीद हारपे ।
मग जानिनलेयां स्वरूपें । नसें चि गा ॥ १०९८ ॥

जागे होता होता झोप कमी कमी होते व अखेर जागेपण
पूर्ण झालें म्हणजे निद्रा अगदीं सपशेल नाहींशी होते,

हें ना आपलें पूर्णत्व भेटे । जेथ चंद्रासि वाढि कुंठे ।
तेथ शुक्लपक्षु आटे । निशेषु जैसा ॥ १०९९ ॥

हे राहू दे पौर्णिमेच्या दिवशी चंद्राला आपले
पूर्णत्व प्राप्त होतें, आणि शुक्लपक्ष तेथेंच संपतो,

तैसें बोध्यजात गीळितु । बोध बोधें ये मजआंतु ।
मिसळला तेथ सांघातु । अबोधु गेला ॥ ११०० ॥

त्याप्रमाणे ज्ञेय म्हणूण जितके काही असेल ते सर्व अद्वैतज्ञानाने नाहीसे होऊन
तो माझ्या स्वरूपांत समरस होऊन जातो, त्या वेळी त्याचे अज्ञानही नाहीसे होते.

तेधवां कल्पांतिचिये वेळे । नदी सिंधुचे पेंडवळे ।
मोडौनि भरे जळें । आब्रह्म जैसें ॥ ११०१ ॥

तेव्हां कल्पांताच्या वेळेला नदी व समुद्र यांचा भेद नाहीसा होतो,
व ब्रह्मांडात सर्वत्र ज्याप्रमाणें जळाशिवाय कांहींही असत नाहीं,

नाना गेलेयां घटमठ । आकाश ठाके एकवट ।
कां जळौनि काष्टें काष्ट । वन्ही चि होए ॥ ११०२ ॥

घट व मठ यांचा अभाव असता आकाश जसें एकवटतें, अथवा काष्ठा
काष्ठांच्या घर्षणानें काष्ठ जळून, जसें तें काष्ठ अग्नी होऊनच राहतें;

नातरि लेणेयांचे ठसे । आटौनि गेलेयां मूसे ।
नामरूपभेदें तैसें । सांडिलें सोनें ॥ ११०३ ॥

किंवा लेण्याचें आकार मुशींत आटून गेल्यावर अलंकाराचे
आकार नष्ट होऊन केवळ सुवर्ण मात्र उरतें;

हें हीं असो चेइलेयां । तें स्वप्न नाहिं जालेयां ।
आपण चि कां आपणेयां । उरिजे जैसें ॥ ११०४ ॥

हें असो. मनुष्य जागा झाला म्हणजे स्वप्न
नाहींसे होतें, आणि आपले आपणच उरतो.

तैसा मी एकु वांचौनि काहिं । तेया तेया ही सकट नाहिं ।
हे चौथी भक्ति पाहीं । माझी तो लाहे ॥ ११०५ ॥

त्या प्रमाणे एक माझ्यावांचून त्याला दुसरें कांहींही उरत
नाहीं, व हिलाच चौथी भक्ती म्हणजे ज्ञानभक्ती म्हणतात.

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ ५५ ॥

भक्त्या, माम्, अभिजानाति, यावान्, यः, च, अस्मि, तत्त्वतः,
ततः, माम्, तत्त्वतः, ज्ञात्वा, विशते, तदनन्तरम्

मी जेवढां आणि जसा आहे, त्या मला भक्तीच्या योगाने
यथार्थ जाणतो, व मला यथार्थ जाणल्यावर तो मद्रूप होतो.

येर आर्त्त जिज्ञासु अर्थी । हें भक्ति जिहीं पंथीं ।
ते तीन्ही पावौनि चौथी । ह्मणत आहों ॥ ११०६ ॥

इतर जे आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी भक्त हे ज्या मार्गांनी माझी भक्ती करतांत, ते भक्तीचे
तीन मार्ग ओलांडून या ज्ञानभक्तीला पोहोचतात म्हणून हिला चौथी भक्ती म्हणतात.

यऱ्हविं तीजी नां चौथी । हे पहिलि नां सरती ।
पैं माझी सहजस्थिती । भक्ति नांव ॥ ११०७ ॥

एरवीं ही तिसरीही नाही, वा चौथी नाही, पहिली नाहीं, आणि
शेवटची नाहीं, माझ्या ब्रह्मरूप सहजावस्थेलाच भक्ती हे नाव आहे.

जें नेणतें माझें प्रकाशूनि । अन्यथात्वें मातें दाउनि ।
सर्व ही सर्वीं भजौनि । बुझावितसे ॥ ११०८ ॥

जी सहज स्वरूपस्थिती मजविषयीचे अज्ञानाचें प्रकाशन करून, मला विपरीतपणानें
भासवून, सर्व ठिकाणी भक्ती करावयास लावून, सर्वांची समजूत घालते.

जो जेथ जैसें पाॐ बैसे । तिया तेथ तैसें चि असे ।
हें उजिवडें कां दीसे । अखंडें जेणें ॥ ११०९ ॥

माझ्याच अखंड चित्प्रकाशामुळे भक्तांची जशी
भावना असते, तसेच त्यांना माझे स्वरूप दिसते,

स्वप्निचें दीसणें न दिसणें । जैसें आपुलेनि असिलेपणें ।
विश्वाचें आहे नाहीं जेणें । प्रकाशे जैसें ॥ १११० ॥

ज्याप्रमाणे स्वप्नाचे दिसणे किंवा न दिसणे आपल्या अस्तित्वावर अवलंबून आहे,
त्याप्रमाणे याविश्वाचे असणे किंवा नसणे हे माझ्या चित्प्रकाशाच्या योगानें भासते,

ऐसा सहजु माझा । प्रकाशु जो कपिध्वजा ।
तो भक्ति या ॐजा । बोलिजे गा ॥ ११११ ॥

हे कपिध्वजा, जसा जो माझा सहज प्रकाश
आहे, तो भक्ती या नांवें ओळखला जातो,

ह्मणौनि आर्त्तांचां ठांइं । हे आर्त्ति होउनि पाहीं ।
अपेक्षणीय जें कांहिं । तें मीं केलां ॥ १११२ ॥

म्हणून आर्ताच्या ठिकाणी ही भक्ती उत्कट इच्छेच्या रूपाने बनून, त्या इच्छेचा जो कांही विषय आहे, तो मलाच समोर ठेवून केलेला असतो.

जिज्ञासुपुढां वीरेषा । हे चि होउनि जिज्ञासा ।
मी जिज्ञासु ऐसा । दाखविला ॥ १११३ ॥

हे वीरश्रेष्ठा, जिज्ञासू म्हणजे ज्ञानेच्छू पुरुषांत हीच भक्ती जिज्ञासा होऊन, मीच जिज्ञासा करण्याचा विषय, म्हणून दाखविला जातों.

हे चि होउनि अर्थना । मी चि माझां अर्थी अर्जुना ।
करूनि अर्थाभिधाना । आणि मातें ॥ १११४ ॥

हीच भक्ती, अर्जुना, अर्थप्राप्तीची इच्छा होऊन, मला अर्थरूप करून तीच मला अर्थ या नावाला आणते.

अथवा घेउनि अज्ञानातें । माझिया भक्ति जैं हें वर्त्ते ।
तैं दावी मज द्रष्टेयातें । दृश्य करुनि ॥ १११५ ॥

अशा प्रकारें अज्ञानाचा आश्रय करून जी ही माझी भक्ती वावरत असते, ती द्रष्ट्स्वरूप असलेल्या मला दृश्य करून दाखवते.

एथ मुख चि दीसे मुखें । या बोला काहिं न चुके ।
परि दूजेपण हें लटकें । आरिसा करी ॥ १११६ ॥

आरशांत आपलें मुख पाहिल्यावर आपलें मुखच दिसत असतें, पण त्यात हा जो दुजेपणा उत्पन्न होतो, तो अभास आरशामुळे होतो.

दीठी चंद्रू चि घे साचें । परि येतुलें हें तिमिराचें ।
जें एक चि असे तेयाचें । दोनि दावी ॥ १११७ ॥

दृष्टी खरोखर चंद्रालाच पहाते परंतु एका चंद्राचे दोन चंद्र दिसणे हे, 'तिमिर' नांवाच्या नेत्ररोगाने होते.

तैसें सर्वत्र मीं चि मियां । देखतसें भक्ती इया ।
परि दृश्यत्व हें वायां । अज्ञानवसें ॥ १११८ ॥

त्याचप्रमाणें, भक्तीच्या यागें सर्व भक्त माझेंच ग्रहण करतात, पण तिथें जें दृशत्व, हे खोटे असून ते अज्ञानवशतेमुळे आहे

तें अज्ञान आतां फीटलें । माझें द्दष्टत्व मज भेटलें ।
निजबिंबिं एकवटलें । प्रतिबिंब जैसें ॥ १११९ ॥

ते अज्ञान आता नाहीसे झाले म्हणजे जसें बिंबांत प्रतिबिंब एकवटून जाते, त्याप्रमाणे माझे द्दष्ट्त्व मला भेटले.

पैं जेधवां इं असे कीडाळ । तेधवां इं सोनें चि अढळ ।
परि तें गेलेयां केवळ । उरे जैसें ॥ ११२० ॥

सोन्याबरोबर हीण असले तरी देखील सोनेच अढळ असते, पण हीण जळून खाक झालें म्हणजे, जसें शुद्ध सोने उरते.

हो कां पुनिवेआदिं कांहिं । चंद्रिं सांधा चि नाहिं ।
परि तिये दीं भेटे पाहीं । पूर्णता तेया ॥ ११२१ ॥

अरे, पौर्णिमेच्या अगोदर चंद्र त्याच्या काही कलांनी युक्त असतो, परंतु पौर्णिमेच्या दिवशीं मात्र त्याला पूर्णत्व भेटते.

तैसा मी चि अज्ञानद्वारें । दीसें परि हस्तांतरें ।
मग दृश्य तें सरे । मियां चि मीं लाभें ॥ ११२२ ॥

त्याप्रमाणे मीच लौकिक ज्ञानाने दृश्य म्हणून वाटतो, परंतु त्यांत द्रष्ट्त्वरूप भेद असतो, मग ज्ञानाने दृश्याचा निरास होऊन ते द्दष्ट्त्वात मावळते आणि मलाच मी प्राप्त होतो.

ह्मणौनि दृश्यपंथा- । अतीतु माझा पार्था ।
भक्तियोगु चौथा । ह्मणितला गा ॥ ११२३ ॥

अर्जुना, म्हणून, माझा चौथा भक्तियोग, तो दृश्यरूप
मार्गाच्या पलीकडला आहे, असें मीं म्हटलें.

येया ज्ञानभक्ती सहज । भक्तु एकवटला मज ।
तो मी चि केवळ तुज । श्रुत ही आहे ॥ ११२४ ॥

या ज्ञानभक्तीने जो भक्त माझ्याशी एकरूप झाला आहे,
तो भक्त म्हणजे केवळ मीच होय, हे तू आधी ऐकलेच आहेस.

जें उभूनियां भुजा । ज्ञानियां आत्मा माझा ।
हें बोलिलों कपिध्वजा । सप्तमाध्याइं ॥ ११२५ ॥

कारण, अर्जुना, सातव्या अध्यायांत ज्ञानी माझा
आत्मा आहे, हें अगदीं हात उभारून बोलला आहे.

ते हे कल्पादि भक्ति मियां । भागवतमीषें ब्रह्मेयां ।
उत्तम ह्मणौनियां । उपदेशिली ॥ ११२६ ॥

अर्जुना, ती ही भक्ती उत्तम आहे, म्हणून मी कल्पाच्या
आरंभी भागवताच्या निमित्ताने ब्रह्मदेवाला उपदेशिली.

ज्ञानिये इयेतें स्वसंवित्ति । ह्मणति शैव शक्ति ।
आह्मीं परमभक्ति । आपुली ह्मणों गा ॥ ११२७ ॥

ज्ञानी हिला स्वसंविती 'आत्मज्ञान' म्हणतात. शैव हिलाच.
शक्ती म्हणतात आणि आम्ही हिला आपली श्रेष्ठ भक्ती म्हणतो.

हे मज मिळतिये वेळे । तेयां क्रमयोगियां फळे ।
मग समस्त ही निखळें । मियां चि भरे ॥ ११२८ ॥

कर्मयोगी मला मिळतात तेव्हाच त्यास ही भक्ती प्राप्त होते व मग
त्या वेळी मीच सर्वत्र भरून राहिलो आहे असे त्यांना उमजते.

तेथ वैराग्य विवेकेंसीं । आटे बंधु मोक्षेंसीं ।
वृत्ति तिया आवृत्तिसीं । बुडौनि जाए ॥ ११२९ ॥

अशा स्थितींत विवेकासकट वैराग्य, व मोक्षासह बंधही आटून
जातात आणि निवृत्तीसह वृत्ती, हीं सर्व नाहींशीं होतात

घेउनि ऐलपणातें । परत्व हारपे जेथें ।
गीळूनि च्यारी भूतें । आकाश जैसें ॥ ११३० ॥

ज्या भक्तीच्या योगानें अलीकडील व पलीकडील हे भेद नाहींतसे होतात,
जसें पृथ्वी, आप, तेज, वायू, या चारी भूतांना व्यापून आकाशच मागें उरावें.

तेया परीं साध्य- । साधनातीत शुद्ध ।
तें मीं होउनि एकवद । भोगी तो माझें ॥ ११३१ ॥

त्याचप्रमाणें साध्य व साधन यांच्या टप्प्यापलीकडील जें निर्मळ, निर्दोष,
असलेले असे शुद्ध स्वरूप ते मी होऊन तो कर्मयोगी आत्मानंदाला अनुभवतो.

घडौनि सिंधुचेया आंगा । सिंधु वरि तळपे गंगा ।
तैसा पाडु तेया भोगा । अवधारिजो ॥ ११३२ ॥

गंगा समुद्रात घुसून जशी समुद्राशीं मिसळून
प्रकाशते, तसा त्या भोगाचा प्रकार आहे, तो जाण.

कां आरिसेयासि आरिसा । उटूनि दाविला जैसा ।
देखणां अतिसो तैसा । भोगणां तिये ॥ ११३३ ॥

अथवा ज्या प्रमाणें एका आरशाला दुसरा आरसा स्वच्छ करून दाखविला असतां, एकमेकांला
पाहण्याचें सुख भोगितात, त्याचप्रमाणे समरस होऊन आत्मानंदाचा अनुभव घेता येतो.

चेइलेयां स्वप्न नासे । आपुलें ऐक्य चि दीसे ।
तें दूजेनविण जैसें । भोगिजे कां ॥ ११३४ ॥

हें असो दर्पणु नेलेयां । तो मुखबोधु ही गेलेयां ।
देखिलेपण एकलेयां । आस्वादिजे जेवि ॥ ११३५ ॥

तो चि जालेयां भोगु तेयाचा । न घडे हा भावो जेयांचा ।
तें हि बोलें किर बोलाचा । उच्चारु कीजे ॥ ११३६ ॥

तेयाचां नेणों गावीं । रवि प्रकाशे हान दिवी ।
किं व्योमालागि पडवी । उभिली तिहीं ॥ ११३७ ॥

हां गा राज्ञत्व नव्हतां आंगिं । रावो आपण काइ भोगी ।
किं आंधारु हान आलंगी । दिनकरातें ॥ ११३८ ॥

आणि आकाश जें नव्हे । तें आकाश काइ जाणावें ।
रत्नाचां रूपिं मिरवे । गुंजांचें लेणें ॥ ११३९ ॥

ह्मणौनि मी होणें नाहिं । तेया मीं आहें कें हीं ।
मग भजैल हें काइ । बोलें किर ॥ ११४० ॥

ययालागी तो क्रमयोगी । मी जाला चि मातें भोगी ।
तारुण्य कां तरुणांगी । जियापरीं ॥ ११४१ ॥

तरंगु सर्वांगिं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबिं ।
नाना अवकाशु नभीं । लुंठतु जैसा ॥ ११४२ ॥

तैसा रूप होउनि माझें । मातें क्रियाविण तो भजे ।
धनाकारु कां साहाजें । सोनेयांतें जेवि ॥ ११४३ ॥

चंदनाची द्रुति जैसी । चंदनीं असे आपैसी ।
कां एकत्र गर्भशशी । चंद्रिका ते ॥ ११४४ ॥

जागेपणां येताच स्वप्न जाते आणि मग आपले ऐक्यच दिसू लागते.
ते एकटेपण ज्याप्रमाणे दुसऱ्या शिवाय आपणच अनुभवत असतो.

हेंही असो, दर्पण दूर नेल्यावर, आणि मुखाभासही नाहींसा झाल्यावर,
पाहणारा आपले ठिकाणींच आपल्या स्वरूपाचा आनंद भोगितो.

आतां वस्तूशीं एकरूप होऊन गेल्यास, त्याचा भोग कसा घेतां येतो ? असा ज्यांचा
अभिप्राय असेल, त्यांना आम्ही विचारतों, कीं शब्दानेंच शब्दाचा उच्चार कसा होतो ?

त्या लोकांच्या गांवांत सूर्य काय दिवा लावून पाहावा लागतों ?
अथवा आकाशासाठीं त्यांनीं मांडव उभारला आहे काय ?

राजाच्या अंगी राजेपणा नसेल तर राजा राजेपणा भोगू शकेल काय ?
अंधार आपलें अस्तित्व कायम ठेवून, सूर्याला आलिंगू शकेल काय ?

आणि जो स्वतः आकाश झाला नाहीं, त्याला आकाश काय आहे,
हें कसें कळेल ? अथवा गुंजाचा अलंकार रत्नभांडारांत शोभा देईल काय ?

म्हणून जो मद्रूप झाला नाही, त्याला माझे' अस्तित्व कसे आकलन
होणार ? मग तो माझी भक्ती करील, हें खरोखर बोलावयास नको.

यास्तवः क्रमानें येणारा योगी मत्स्वरूप होतो, व माझे स्वरूपाचा
उपभोग घेतो. ज्याप्रमाणे तरुण स्त्री आपल्या तारुण्याचा उपभोग घेते.

तरंग सर्वांगानें पाण्याचों चुंबन घेतो, अथवा प्रभा बिंबाशी एक होऊन
बिंबाच्या रूपाने शोभते, आणि आकाशात पोकळीच जशी नांदत असते,

त्याप्रमाणे मद्रूप होऊन, क्रियाहीन होऊन मला भजत
असतो. अलंकार जसा स्वाभाविकपणें सोन्याचा भोग घेतो.

किंवा सुवास जसा चंदनाच्या ठिकाणीं अंगभूत असतो, चांदणे
जसें कांहींही क्रिया न आचरतां चंद्रबिंबांत विलसत असतें,

तैसी क्रिया किर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे ।
हें अनुभवाजोगें नोहे । बोला ऐसें ॥ ११४५ ॥

त्याचप्रमाणे अद्वैतांत जरी क्रियेला वाव नाहीं: तरी देखील अद्वैतात भक्तीला जागा राहातेच. हे बोलण्याचे काम नाही. याचा अनुभव घ्यायला हवा.

तेधवां पूर्वसंस्कारसंदें । जें कहिं तो अनुवादे ।
तेणें आळविलेनि यो दें । बोलता मीं चि ॥ ११४६ ॥

तेव्हां पूर्वीच्या संस्कारांमुळे तो जे काही बोलतो, तर त्याच्या प्रार्थनेला मी 'ओ' देतो, आणि बोलणाराही मीच असतों.

बोलतेया बोलता चि भेटे । तेथ बोलिलें हें न घटे ।
तें मौन तंव गोमटें । स्तवन माझें ॥ ११४७ ॥

बोलणारा स्वतः जर स्वतःलाच भेटला तर तेथें तो बोलतो असें कसें म्हणता येईल ? तें मौन म्हणजेच माझी उत्तम स्तुती होय.

ह्मणौनि तेया बोलतां । बोलीं बोलता मीं भेटतां ।
मौन होये तेणें तत्वता । स्तवी तो मातें ॥ ११४८ ॥

म्हणून तो भक्त बोलूं लागला असतां मीच तें बोलत असल्यामुळें ते बोलणेच मौन होते. आणि त्या मौनानेंच तो खरोखर माझी स्तुती करतो.

तैसें चि बुद्धी कां दीठी । जें देखों जाये तो किरीटी ।
तें देखणेयां दृश्य लोटी । देखतें चि दावी ॥ ११४९ ॥

त्याच प्रमाणें अर्जुना, बुद्धीने अथवा डोळ्याने तो जे पहावयास जातो, ते पाहणे, दृश्याला नाहीसे करून द्रष्ट्याला दाखविते,

आरिसेया आदी जैसें । देखतें चि मुख दीसे ।
तेया तें देखणें तैसें । मेळवी द्रष्टें ॥ ११५० ॥

आरशात पाहाण्यापूर्वी जसे मुख होते तसेच ते आरशात पहातानाच दिसते, त्याचप्रमाणे या भक्ताचें पाहणें त्याला स्वतःचेंच दर्शन घडवितें.

दृश्य जाउनियां दृष्टे । द्रष्टेयासी चि जैं भेटे ।
तैं एकलेपण न घटे । द्रष्टेपण हि ॥ ११५१ ॥

जेव्हा दृश्याच्या कल्पनेचा निरास होऊन द्रष्टा द्रष्ट्यालाच भेटतो, तेव्हां द्रष्टाच एकमेव रहात असल्याकारणाने द्रष्टेपणही नाहीसे होते.

तेथ स्वप्निचिया प्रिया । चेउनि झोंबों गेलेयां ।
ठाइजे दोन्ही होउनियां । आपण चि जैसें ॥ ११५२ ॥

तेव्हां स्वप्नात दिसलेल्या प्रियेस आलिंगन देण्यास गेला असतां एकदम जागा होतो. मग स्त्री व पुरुष हे दोन्हीं नाहीसे होऊन जसा केवळ आपण मात्र राहतों;

कां दोन्ही काष्टांचिया घृष्टी- । माझि वन्हि जो एकु उठी ।
तो दोनि हे भाष आटी । आपण चि होए ॥ ११५३ ॥

अथवा दोन लाकडांच्या घर्षणाने जो अग्नी उत्पन्न होतो, तिथें दोन काष्टें ही भाषा हारपून जसा केवळ अग्नीच उरतो.

नाना प्रतिबिंब हातिं । घेउँ गेलेयां गमस्ती ।
बिंबता ही थिती । जाये जैसी ॥ ११५४ ॥

सूर्य आपलें प्रतिबिंब हातांत घेऊं गेला असतां प्रतिबिंब तर जातेंच, पण प्रतिबिंब सापेक्ष असणारे त्याचें बिंबत्वही लोपते.

तैसा मी होउनि देखतें । तो घेउँ जाये दृश्यातें ।
तेथ दृश्य नेथिलें तें । दृष्टत्व ही ॥ ११५५ ॥

त्याप्रमाणें, मद्रूप होऊन जो दृश्य वस्तू पाहण्यास जातो, तेव्हां सर्वत्र मीच असल्यामुळे दृश्य नाहीसे होते,

रवी आंधारु प्रकाशितां । नुरे चि जेवि प्रकाश्यता ।
तेवि दृश्या नाहिं दृष्टता । मी जालेयां ॥ ११५६ ॥

सूर्य अंधाराला प्रकाशू गेल्यावर ज्याप्रमाणे प्रकाश्य जो अंधार तो उरत नाही, त्याप्रमाणें सर्व मी झाल्यावर, म्हणजे दृश्याच्या ठिकाणीं दृश्यत्वच उरत नाहीं.

मग देखिजे कां नेदखिजे । ऐसी जे दशा निफजे ।
तें तें दर्शन माझें । साचोकारें ॥ ११५७ ॥

मग पाहणे घडत नाही व न पाहणेही घडत नाही, अशी जी स्थिती तेंच खरें दर्शन.

तें भलेतेया किरीटी । पदार्थाचिया भेटी ।
दृश्यादृश्यातीता दृष्टी । भोगी तो सदा ॥ ११५८ ॥

अर्जुना, कोणताही पदार्थ पहात असता तो क्रमयोगी पुरुष द्रष्टा व दृश्य या भावरहित दृष्टीने त्यांचा अनुभव घेत असतो.

आणि आकाश हें आकाशें । दाटलें न ढळे जैसें ।
मियां आपणपेनि तैसें । जालें तेया ॥ ११५९ ॥

आणि आकाश हे सर्वव्यापक असल्यामुळें जसें ढळत नाही. त्याप्रमाणें माझ्या आत्मस्वरूपाशी जो एकरूप झाला असल्यामुळे त्याला येणे जाणें राहिलें नाहीं.

कल्पांति उदक उदकें । रुंधलेयां वाहो ठाके ।
तैसे आत्मेनि मियां एकें । कोंदला तो ॥ ११६० ॥

कल्पांतीं सर्वत्र पाणीच पाणी झाल्यामुळे पाण्याचे प्रवाह उरत नाहीत, त्याप्रमाणे माझ्या एका आत्मस्वरूपानेच तो संपूर्ण भरून जातो.

पाऊँ आपणपेयां वळघे । केवि वन्हि आपणपेयां लागे ।
आपणपेया पाणी रिगे । गंगे स्नाना केवि ॥ ११६१ ॥

पाय आपल्यावरच कसा चढेल ? आग आपल्यालाच कसें जाळील ? पाणी पाण्याने कसे स्नान करणार ?

ह्मणौनि सर्व मी जालेपणें । ठेलें तेया एणें जाणें ।
हें चि गा यात्रा करणें । अद्वया मज ॥ ११६२ ॥

म्हणून जो सर्वस्वीं मद्रूप झाल्यामुळें, त्याचे जाणे येणे समाप्त होते, त्यामुळे हीच माझी अद्वैतयात्रा होय.

पैं जळावरिलु तरंगु । जऱ्हीं धांविंनला सवेगु ।
तऱ्ही नाहिं भूमीभागु । क्रमिला जैसा ॥ ११६३ ॥

पाण्यावर लाट कितीही जोराने धावली, तरी ती पाण्याशिवाय भूमीवर धावत नाही,

जें सांडावें कां ठेवावें । चालणें जें चालावें ।
तें तो चि एक आघवें । ह्मणौनियां ॥ ११६४ ॥

त्या लाटेनें जें ठिकाण टाकावें. किंवा ज्या ठिकाणी तिला जावयाचे, जें चालणें व ज्याच्या योगानें चालावयाचें, ते संपूर्ण एक पाणीच असते,

गेलेयां भलेतेउता । उदकपणें पांडुसुता ।
तरंगाची कां निश्चळता । न मोडे चि जेवि ॥ ११६५ ॥

अर्जुना, ती लाट वाटेल तिकडे गेली तरी तें उदक असल्यानें तरंग व पाणी यांचे ऐक्य कधी बदलत नाही.

तैसा मीपणें हालों ठेला । तो आघवेया चि मज आला ।
इया यात्रा होये भला । कापडी माझा ॥ ११६६ ॥

त्याप्रमाणें मद्रूप झाल्यावर, मीपणाने हा कितीही वाहवला, तरी तो संपूर्ण सर्व बाजूनीं मला प्राप्त झाला ही माझीच यात्रा होते व तो माझाच यात्रेकरू ठरतो.

आणि शरीरस्वभाववसें । जांहिं एक करूं बैसे ।
तरि मीं चि तेवि तेणें मीसें । नेटें तेया ॥ ११६७ ॥

तेथ कर्म आणि कर्त्ता । हें जाउनियां पांडुसुता ।
मी आत्मेनि मातें पांतां । मीं चि होयें ॥ ११६८ ॥

पैं दर्पणातें दर्पणें । पाहिलेयां होये न पाणें ।
सोने झांकिलेयां सुवर्णें । न झंके जेवि ॥ ११६९ ॥

दीपातें दीपें प्रकाशिजे । तें न प्रकाशणें चि निफजे ।
तैसें कर्म मियां कीजे । तैं करणें कैंचें ॥ ११७० ॥

तें होंत चि आहे । जैं करावें भाष जाए ।
ऐसें न करणें चि होए । तेयाचें केलें ॥ ११७१ ॥

क्रियाजात मियां जालेपणें । घडे काहिं चि न करणें ।
तेया चि नांव पूजणें । खुणेचें माझें ॥ ११७२ ॥

ह्मणौनि करितिया बोजा । न करणें कपिध्वजा ।
निफजे तेया महापूजा । पूजि तो मातें ॥ ११७३ ॥

येवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन ।
अद्वया मज गमन । तो चाले तें चि ॥ ११७४ ॥

तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जपु माझा ।
तो असे ते चि कपिध्वजा । समाधि माझी ॥ ११७५ ॥

जैसें कनकेंसिं कांकणें । असिजे अनन्यपणें ।
तो भक्तियोगें एणें । मासिं तैसा ॥ ११७६ ॥

किंबहुना तंतुसिं पटु । कां मृत्तिकेसीं घटु ।
तैसा तो एकवटु । मजसिं माझा ॥ ११७७ ॥

आणि शरीराच्या स्वभावधर्मानुसार तो जरी काहीं करू गेला, तरी त्या कर्माच्या निमित्तानेंही मीच त्याला भेटतों.

पंडुसुता, तिथें कर्म आणि कर्ता, हे दोन्ही भाव जाऊन, मला आत्मस्वरूपानें पाहून तो स्वतःच मी होतोंः

आरशानें आरशाला पाहाणें हें जसें पाहणे होत नाही, तसे सोन्यानें सोनें झाकलें असतां, ते जसे झाकले जात नाही.

दिव्याने दिव्यालाच प्रकाशित केले असतां तें न प्रकाशणेंच होतें, तसे मद्रूप होऊन कर्म केलें तें कर्म करणें कसें म्हणावें ?

कर्म केलें जात असतांही जेव्हां कर्म करावें, ही भाषा हारपते, तेव्हां तें त्याचें कर्म करणें न केल्याप्रमाणेंच आंहे.

यच्चयावत् कर्म मद्रूपच झाल्याकारणांने, काहीच न करणे हेच माझे खरोखर पूजन होय. ही खूण लक्षांत ठेव.

म्हणून हे अर्जुना, तो ज्या ज्या यथासांग क्रिया करतो, तें त्याचें न करणेंच होते, व तीच माझी महापूजा होते.

अशा रितीने तो जे बोलेल ते माझे स्तवनच होते. तो पाहतो ते माझेच दर्शन, व जातो ते गमनही मद्रूपच होते.

हे कपिध्वजा, तों जें करील ती माझी पूजा, तो जें मनांत आणील, तोच माझा जप, तो जसा असेल, तीच माझी समाधी.

ज्या प्रमाणें सोन्याचें कांकण सोन्याशी अभेद आहे, त्याप्रमाणे भक्तियोगानें माझ्याशीं तो एकरूप झालेला असतो.

अथवा जसा तंतूंशीं पट, किंवा मृत्तिकेशीं जसा घट एकवटून असतो, तसा तो माझा भक्त माझ्याशीं ऐक्य पावतो.

उदकिं कल्लोळु । कापुरिं परिमळु ।
रत्निं उजाळु । अनन्यु जैसा ॥ ११७८ ॥

पाण्याचे ठिकाणीं लाट, कापरांत सुवास, व
रत्नाचे ठिकाणीं तेज हे जसे एकवटलेले असतात.

इया अनन्यभक्ती । इयें आघवीं चि दृश्यजातीं ।
मज आपणपेयां सुमती । द्रष्टेयातें जाणें ॥ ११७९ ॥

हे सुमते, या स्वयंसिद्ध अनन्यरूप भक्तीच्या योगाने या सर्वच
दृश्यमात्रा मध्ये तो ज्ञानी भक्त मला दृष्ट्याला पाहतो.

तिहीं अवस्थांचेनि द्वारें । उपाधि उपहिताकारें ।
भावाभावरूप स्फुरें । दृश्य जें हें ॥ ११८० ॥

जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थांमुळें, स्थूल, सूक्ष्म व कारण
या तीन देहरूप उपाधींच्या रूपाने, जें हें भावाभावरूपी दृश्य स्फुरत असतें,

तें हें आघवे चि द्रष्टा । ऐसा बोधाचां माजिवठां ।
अनुभवाचा सुभटा । ढेंढा तो नाचे ॥ ११८१ ॥

हे शूरश्रेष्ठा, तें हें सर्वच मी द्रष्टा आहें, अशा
या बोधाच्या भरांत, तो भक्त नाचू लागतो.

रज्जु जालेयां गोचरु । आभासता तो व्याळाकारु ।
रज्जू चि ऐसा निर्धारु । होये जेवि ॥ ११८२ ॥

रज्जू आपल्या स्वरूपानें दिसल्यावर सापाचा तीवर होणारा भास
नाहींसा होऊन, ती दोरीच आहे असे असे निश्चित ज्ञान होते.

भांगारापरौंते काहीं । लेणें गुंजभरि ही नाहिं ।
हें आटूनि पाइं । कीजे जैसें ॥ ११८३ ॥

सोन्या व्यतिरिक्त अलंकार म्हणून आणखी काही नसते,
हें जसे दागिना आटवून ज्याप्रमाणे निश्चित करावे,

उदका एकापरौतें । तरंग नाहिं चि हें निरुतें ।
जाणौनि तेया आकारातें । नेघपे जेवि ॥ ११८४ ॥

एका पाण्याव्यतिरिक्त तरंग म्हणून काहीच नाही,
हें जाणून त्यांच्या आकाराला जो भुलत नाहीं;

कां स्वप्नविस्तारा समस्तां । चेउनियां उमाणें घेंता ।
आपणपेयां परौता । न दिसे जैसा ॥ ११८५ ॥

स्वप्नातील सर्व विकार जागृतीत विलयास जावेत, व माप
घेतलें असतां, आपलेविरहित दुसरे कांहीं नाहीं असें दिसतें,

तैसी जे काहिं आथिनाथि- । पणें जे होये स्फूर्ति ।
ते ज्ञाता चि मीं हे प्रतीति । होउनि तो भोगी ॥ ११८६ ॥

त्याचप्रमाणे जे कांही आहे किंवा जे कांही नाही या भावाने ज्ञेयाचे
स्फुरणहोते, तें मी ज्ञाताच आहे, अशा अनुभवाचा तो उपभोग घेतो.

जाणे अजु मीं अजरु । अक्षय मीं अक्षरु ।
अपूरु मीं अपारु । आनंदु मीं ॥ ११८७ ॥

मी जन्मरहित आहे, मी वार्धक्यरहित आहे, मी अविनाशी आहे,
अक्षर, अक्षय, अपूर्व आहे, व अपार आहे, मी आनंदच आहें.

अचळु मीं अच्युतु । अनंतु मीं अद्वैतु ।
आद्यु मीं अव्यक्तु । व्यक्तु ही मीं ॥ ११८८ ॥

मी अचळ व अच्युत, मला सीमा नाही, अंत नाही,
सर्वांचें मूळ, निराकार व साकारही मीच आहें.

ईशु नीं ईश्वरु । अनादि मीं अमरु ।
अभय मीं आधारु । आधेय मीं ॥ ११८९ ॥

सर्वांचा, ईश, मी ईश्वर, अनादि व अमर, अभय
आणि आधार, आणि अधारभूतही मीच आहे.

स्यामि मीं सदोदितु । सहजु मीं सतंतु ।
सर्व मी सर्वगतु । सर्वातीतु मीं ॥ ११९० ॥

मी सत्ताधारी, मी स्वतःसिद्ध व अखंड आहे, सर्व मीच असून
मीच सर्वत्र आहे, आणि सर्वांच्या पलीकडला असा मी आहें.

नवा मी पुराणु । शून्य मीं संपूर्णु ।
अस्थूळु मी अणणू । जें काहिं तें मीं ॥ ११९१ ॥

मी नवा, मी पुराणपुरुष, मी शून्य आहे व संपूर्ण आहे,
सर्वांहून मोठा व अणूरेणूहूननही लहान असा, तो मीच आहें.

अक्रिय मीं एकु । असंगु मी अशोकु ।
व्याप्य मी व्यापकु । पुरुषोत्तमु मीं ॥ ११९२ ॥

मी क्रियारहित आहे, मी एक आहे, संगरहित व शोकरहित, असा मी सर्व वस्तूंत
असून, माझ्यांत सर्व वस्तू आहेत, मी व्याप, मी व्यापक, आणि पुरुषोत्तमही मीच आहें.

अशब्दु मीं अश्रोतृ । अरूप मीं अगोत्रु ।
समु मीं स्वतंत्रु । ब्रह्म मीं पर ॥ ११९३ ॥

मी शब्दरहित व कर्णरहित आहे, रूपरहित आणि गोत्ररहित,
मी समस्वरूप व स्वतंत्र आहे, मी परात्पर ब्रह्म आहे

ऐसें आत्मत्वें एका मातें । इया भक्ती जाणे विरुतें ।
आणि इया बोधा जाणणें तें । तें ही मीं चि जाणे ॥ ११९४ ॥

असें आत्मस्वरूपीं ऐक्य पावून, मला एकाला अद्वैतभक्तीद्वारे खरोखर जाणतो,
आणि आत्मबोधाला जाणणें तें ज्ञान मीच आहें, असे तो भक्त ओळखतो.

पैं चेइलेया नंतरें । आपलें एकपण उरे ।
तें हीं तें वरि स्फुरे । तेयासि जैसें ॥ ११९५ ॥

स्वप्नातून जागे झाल्यानंतर आपले एकपणच
उरतें, आणि तें जसें त्याचें त्यालाच कळतें.

कां प्रकाशतां अर्कु । तो चि होये प्रकाशकु ।
तेया ही अभेदा द्योतकु । तो चि जैसा ॥ ११९६ ॥

किंवा सूर्य प्रकट झाला म्हणजे तोच प्रकाशक होतो, आणि प्रकाशक
व प्रकाश्य हे दोन्ही अभिन्न, त्या अभेदाचा द्योतकही तोच असतो.

तैसा वेद्याचां विलइं । केवळ वेदकु उरे पाहीं ।
तेणें जाणिवे तेया तो ही । हें इं जें जाणे ॥ ११९७ ॥

तद्वत् ज्ञानविषयाचा लोप झाल्यामुळें केवळ जाणणाराच
उरतो, हेही जो जाणतो, तोही मीच आहें असें तो समजतो,

तेणें अद्वय आपणां आपलेया । जाणति ज्ञप्ति जे धनंजया ।
ते ईश्वरू चि मीं तेया । बोधासि एं ॥ ११९८ ॥

अर्जुना, त्या आपल्या अद्वयपणाला जाणणारी जी ज्ञानशक्ति,
ती शक्तिही सर्वसमर्थ मीच होय, हेंही त्याला कळून येतें.

मग अद्वैतातित । मी चि आत्मा एकु निभ्रांत ।
हें जाणौनि जाणणें जेथ । अनुभविं रिगे ॥ ११९९ ॥

मग द्वैत व अद्वैत यांच्या पलीकडे असणारा जो आत्मा
म्हणजे मीच, हे ज्ञान जेथे अनुभवात प्रवेश करते.

तेथ चेइलेयां एकपण । दीसे जें आपणेयां आपण ।
ते हिं जांतां नेणों कोण । होइजे जेवि ॥ १२०० ॥

स्वप्न विरते, स्वप्नातील दृश्य जाते, आपल्या एकपणाचें जें भान होतें,
तेंही नाहींसें होऊन त्याचें स्वरूप कसें असावें हे जसे कळत नाही,

कां डोळा देंतिये क्षणीं । सरूपपण सुवर्णीं ।
आटौनि होये आटणीं । घनाकाराची ही ॥ १२०१ ॥

सोन्याच्या दागिन्याकडे सोन्याच्या दृष्टीनें पाहिल्या
बरोबर, अलंकार न आटतां त्याची आटणी होते;

नाना लवण तोय होए । मग क्षारता तोयत्वें राहे ।
तें किं जिरतां जें जाए । जालेपण तें ॥ १२०२ ॥

अथवा मीठ पाण्याशीं मिसळून पाणी झाल्यावर त्याचा खारटपणा पाण्याच्या
रूपाने राहतो, व तोही जिरून गेल्यावर जसें मिठाचें अस्तित्व अजिबात पुसतें,

तैसा मीं तो हें जें असें । तें स्वानंदानुभवरसें ।
कालवौनि प्रवेशे । मज चि माझि ॥ १२०३ ॥

त्या प्रमाणें मी देव व तो भक्त, असे जे द्वैत आहे ते स्वानंदाच्या
अनुभवात मिसळून जाते व तो माझ्याच ठिकाणी प्रवेश करतो.

आणि तो हे भाष तेथ जाए । तेथ मीं कोणासिं आहें ।
ऐसा मीं नां तो तिये सामाए । माझां चि रूपीं ॥ १२०४ ॥

आणि तो ही भाषा जेथें संपते, तेथें मीं हें कोणाला म्हणायचे ?
जेथें मी नाहीं व तोहीं नाहीं, अशा माझ्याच स्वरूपांत तो सामावतो.

जेधवां कापुरु जळों सरे । तेया चि नांव आगि पुरे ।
मग उभयातीत उरे । आकाश जेवि ॥ १२०५ ॥

जेव्हां कापूर जळून संपतो, त्याच वेळेला अग्नीचीही समाप्ती होते.
मग त्यांच्याहून वेगळे असलेले केवळ आकाश मात्र उरते.

कां गेलेया एकाएकु । वाढे तो शून्यविशेखु ।
तैसा आहेनाहींचा शेखु । मीं चि मग आथि ॥ १२०६ ॥

अथवा एकातून एक वजा केला असता बाकी जशी शून्य निघते,
त्या प्रमाणें आहे व नाहीं हे सापेक्ष भाव गेल्यावर शेष मग मीच राहतो,

तेथ ब्रह्म आत्मा ईशु । या बोला माडे सौरसु ।
न बोलणेयां हिं पैसु । नाहिं जेथ ॥ १२०७ ॥

तेव्हा ब्रह्म, आत्मा, ईश्वर या शब्दांच्या या बोलण्यालाही जागा
रहात नाहीं, व न बोलण्यालाही तेथें अवकाश राहत नाहीं,

न बोलणें हिं न बोलौनि । तें बोलिजे तोंड भरूनि ।
जाणिवे नेणिव नेणौनि । जाणिजे तो ॥ १२०८ ॥

न बोलणें हें न बोलून मग तोंडभर बाललें जाते, आणि ज्ञान
व अज्ञान यांची जाणीव नसूनही तें यथास्थित जाणावे !

तेथ बोधिजे बोधु बोधें । आनंदु घेपे आनंदें ।
सुखवरि नसुदें । सुख भोगिजे ॥ १२०९ ॥

त्या ठिकाणी बोधानेच बोध जाणायचा; आनंदानेच
आनंद घ्यावयाचा व सुखानेच केवळ सुख भोगायचे,

तेथ लाभु जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा ।
विस्मयो बुडाला उभा । विस्मयामाझि ॥ १२१० ॥

तेथें लाभाला लाभ प्राप्त झाला. तेजच तेजाला
भेटते, आश्चर्यच आश्चर्यात पूर्णपणे बुडते,

समु तो सामाविला । विश्रामु विश्रांती आला ।
अनुभवु ही वेडावला । अनूभूतीपणें ॥ १२११ ॥

शम तेथे समत्व घेतो, विश्रामही विश्रांतीस
येतो, अनुभव अनुभतीनेच वेडावून जातो.

किंबहुना ऐसें निखळ । मीपणें जोडे तेया एक फळ ।
सेउनि वेल्हाळ । क्रमयागाची ते ॥ १२१२ ॥

फार काय सांगावे ! असे जे शुद्ध मीपण हें फळ त्या कर्मयोग्याला,
कर्मयोगाची विस्तृत अशा वेलीचें सेवन करून मिळाले.

पैं क्रमयोगा किरीटी । चक्रवर्तिचां मुगुटीं ।
मी चिद्रत्न ते साटोवाटी । होये तो माझा ॥ १२१३ ॥

आणि, अर्जुना, या कर्मयोगांतील सम्राटाच्या मुकुटावर असणारे 'चिद्रत्न'
जो मी, तें तो क्रमयोगी आपली जीवदशा मला अर्पण करून, मिळवतो;

किं क्रमयोगप्रसादाचा । कळशु जो हा मोक्षाचा ।
तेया वरिला आकाशाचा । उवाऊँ जाला तो ॥ १२१४ ॥

अथवा क्रमयोगरूपी मंदिराचा जो हा मोक्षरूपी कळस, त्या
मोक्षरूपी कळसावरील आकाशाचा विस्तार तो कर्मयोगी होतो,

नाना संसारअडवीं । क्रमयोगु वाट बरवी ।
जोडलियां मदैक्यगाविं । पेठा जाला ॥ १२१५ ॥

अथवा संसाररूपी आरण्यात कर्मयोगाची उत्तम वाट
असून ती सडक मत्स्वरुपी गावात येऊन ठेपली आहे.

ऐसा क्रमयोगु ॐघें । तेणें भक्तिचित्तगंगें ।
मी स्यानंदोदधि वेगें । टाकिला गा ॥ १२१६ ॥

किंवा, ज्ञानभक्तीच्या पाण्याबरोबर कर्मयोगाच्या प्रवाहमार्गानें तो 'मी' नांवाचा
जो स्यानंदरूपी सागर, त्या सागराला मोठ्या वेगानें येऊन पोंचतो.

हा ठाऊँवेरीं सुवर्मा । क्रमयोगी आहे महिमा ।
ह्मणौनि वेळोवेळां तुह्मां । साघों तें आह्मीं ॥ १२१७ ॥

हे मर्मज्ञ अर्जुना, क्रमयोगाची एवढी मोठी थोरवी आहे,
म्हणून मी वारंवार त्याचें वर्णन तुझ्याजवळ करतों;

पैं देशे काळे पदार्थे । साधुनि घेइं मातें ।
तैसा नव्हे मी आइतें । सर्वांचें सर्व ॥ १२१८ ॥

योग्य देश, योग्य काळ, व योग्य पदार्थ ह्यांच्या साधनाने माझी प्राप्ती
होईल अशातला मी नाही. मी स्वतः सिद्ध आहे, सर्वांच्या स्वरूपाने मीच आहे.

एकु शिष्यु एकु गुरु । हा रूढला साचु वेव्हारु ।
तो मत्प्राप्तिप्रकारु । जाणावेया ॥ १२१९ ॥

एक शिष्य आणि एक गुरु, हा अनादिसिद्ध मार्ग,
केवळ माझ्या प्राप्तीचा मार्ग जाणण्यासाठींच आहे.

ह्मणौनि माझां ठांइं । जचावें न लगे काहिं ।
मी लाभें ये उपाइं । जचिजे चि गा ॥ १२२० ॥

म्हणून माझ्या प्राप्तीसाठीं कोणताही जाच सहन करावा लागत
नाहीं. मी केवळ या अनन्य भक्तीच्या उपायानेच प्राप्त होतो.

अगा वसुधेचां पोटीं । निधान सिद्ध किरीटी ।
वन्हि सिद्धु काष्टीं । वोहां दूध ॥ १२२१ ॥

मी स्वतः सिद्ध कसा आहे ? भूमीत संपत्ती असावी, लाकडात अग्नी
असावा, व गाईच्या कासेंत दूध आयतेंच आहे, तसा मी आहे.

परि लाभे तें असतें । तेया कीजे उपायातें ।
एर सिद्ध तैसा येथें । उपायें मीं ॥ १२२२ ॥

परंतु या गोष्टी सिद्ध आहेत तरी त्यांचा लाभ होण्याकरितां काहीं उपाय करावे लागतात, त्या प्रमाणें मी स्वतःसिद्ध आहे खरा, तरी साधनमार्गानेच माझी प्राप्ती करून घ्यावी लागते.

हा फळ ही वरि उपाऊँ । कां प्रस्तावितसे देवो ।
हें पूसा तरि अभिप्राऊँ । एथिचा ऐसा ॥ १२२३ ॥

फळ सांगितल्यानंतर देखील साधन मार्ग सांगण्याचा देव पुन्हा कां उपक्रम करीत आहेत असें तर या शंकेला उत्तर असे आहे;

जें गीतार्थाचें चांगावें । मोक्षउपाय परि आघवें ।
आणि शास्त्रउपाय किं न्हवे । प्रमाणसिद्धी ॥ १२२४ ॥

गीतेचें सामर्थ्य यात आहे कीं, संपूर्ण गीताशास्त्र हे मोक्षप्राप्तीचे उपाय सांगणारें आहे, इतर शास्त्रांनी सांगितलेलें उपाय प्रमाणसिद्ध नाहींत,

वारा अभाळ चि फेडी । वांचौनि सूर्यातें न घडी ।
कां हातु बाबुळी धाडी । तोय न करी ॥ १२२५ ॥

वारा अभ्र दूर सारतो, परंतु त्याला कांहीं सूर्य निर्माण करतां येत नाहीं; हाताला शेवाळ बाजूस करतां येते, पण तो कांहीं नवे पाणी निर्माण करीत नाहीं,

तैसा आत्मदर्शनीं आडळु । असे जो अविद्येचा मळु ।
तो शास्त्र नासी एरु निर्मळु । प्रकाशें स्वयें ॥ १२२६ ॥

तसा आत्मदर्शनाच्या मार्गांत अविद्येचा जो अडथळा येतो, तो इतर शास्त्रांनीं नाहींसा होतो, येरवीं मी निर्मळ आणि स्वयंप्रकाशच आहे.

ह्मणौनि आघवीं चि शास्त्रें । अविद्याविनाशिचीं पात्रें ।
वांचौनि नव्हंति स्वतंत्रे । आत्मबोधीं ॥ १२२७ ॥

म्हणून संपूर्ण शास्त्रे अविद्येचा नाश करण्याची साधने आहेत. याच्या पलीकडे त्यांना आत्मस्वरूपाचें ज्ञान करून देण्याचे स्वातंत्र्य नाहीं.

तेया आत्मबोधा शास्त्रांसि । जैं साचपणांची ये पूसि ।
तैं एइजे जेया ठायासि । ते हे गीता ॥ १२२८ ॥

त्या आत्मज्ञान प्रतिपादक शास्त्रांना जेव्हा त्यांच्या खरेपणाविषयींचा प्रश्न येतो, तेव्हां तीं ज्या ठिकाणीं जातात, त्या अंतिम स्थानी गीता आहे.

भानुभूषिता प्राचिया । येरी सतेजा दिशा आघविया ।
तैसी असे सर्वा गीता येया । सनाथें शास्त्रें ॥ १२२९ ॥

सूर्यानें पूर्वदिशा अलंकृत केली म्हणजे ज्याप्रमाणे सर्व दिशा प्रकाशमान होतात, त्या प्रमाणें सर्व शास्त्रांत श्रेष्ठ असलेल्या या गीतेच्या योगानें सर्व शास्त्रे सनाथ झालीं आहेत.

हें असो एणें शास्त्रेश्वरें । मागां उपावो बहुवें विस्तारें ।
सांघितला असे जो निकरें । घेऊँ ये आत्मा ॥ १२३० ॥

हें असो, या गीताशास्त्रेश्वरानें, आत्मप्राप्ती करून घेण्याचे अनेक उपाय मागें पुष्कळ विस्ताराने कथन केले आहेत.

परि प्रथमा श्रवणासवें । अर्जुना विपायें फावे ।
हा भाऊँ सकणवे । धरुनि श्रीहरी ॥ १२३१ ॥

पंरतु, हा विषय एकदाच ऐकल्यानें अर्जुनाला क्वचितच् समजले असेल, असें मोठ्या कळकळीनें श्रीहरींनीं मनात आणलें.

तें चि प्रमेय येकोल । शिष्यें होआवें अढळ ।
सांघिजतसे मुकुळ- । मुद्रा आतां ॥ १२३२ ॥

एकवेळ सांगितलेला सिद्धान्तच शिष्याच्या ठिकाणी पक्का दृढ होण्या करितां, पुन्हा संक्षिप्त रीतीनें श्रीकृष्ण सांगत आहेत.

आणि प्रसंगें गीता । हा ठावो ही संपता ।
ह्मणौनि दावी आद्यंता । एकार्थत्वें ॥ १२३३ ॥

आणि सहजासहजी गीता देखिल समाप्त होत असल्यामुळे, तिचा
आरंभ व अंत यांत एकसूत्रीपणा आहे, हें श्रीकृष्ण दाखवीत आहेत.

जें ग्रंथाचां मध्यभागीं । नाना अधिकारप्रसंगीं ।
निरूपण अनेगीं । सिद्धांतीं केलें ॥ १२३४ ॥

या गीता-ग्रंथांच्या मध्यभागात निरनिराळ्या अधिकार
प्रसंगी अनेक सिद्धान्त मांडून जे प्रतिपादन केले,

तरि तेतुले ही सिद्धांत । इये शास्त्रीं प्रस्तुत ।
हें पूर्वापर नेणत । कोण्ही जैं मानीनां ॥ १२३५ ॥

तेव्हां ते सर्व सिद्धान्त या गीताशास्त्रांत प्रस्तुत आहेत,
असे जर कोणी मागलापुढला संबंध न जाणून मानील,

तें महासिद्धांचा एवाका । सिद्धांतकक्षा अनेका ।
भिडूनि आरंभे देखां । संपवितसें ॥ १२३६ ॥

या महासिद्धान्ताच्या अंतरंगातच इतर सिद्धान्ताच्या बाजू अंतर्भूत आहेत,
असें सिद्ध करून गीतेच्या आरंभाची समाप्तीशीं एकवाक्यतां केली आहे.

एथ अविद्यानाशु हें स्थळ । तेणें माक्षोपादान फळ ।
येयां दोहीं केवळ । साधन ज्ञान ॥ १२३७ ॥

या गीताशास्त्रात अविद्येची निवृत्ती हा विषय आहे, तिथे
मोक्षप्राप्ती हें फळ, आणि या दोहोंचेंही साधन ज्ञान आहे.

हें एतुलें चि नानापरीं । निरोपिलें ग्रंथविस्तारीं ।
तें आतां दों आखरीं । अनुवादावें ॥ १२३८ ॥

हे इतकेच या विशाल ग्रंथांत नाना प्रकारांनीं विस्तृत रीतीनें
सांगितले आहे. हेंच विवेचन आतां दोन शब्दात पुन्हा सांगावयाचे आहे.

ह्मणौनि उपेय ही हातीं । जालेयां उपायस्थिति ।
देॐ प्रवर्त्तले पुडुतीं । एणें चि भावें ॥ १२३९ ॥

म्हणून साध्यही प्राप्त झाल्यावर साधनांचें स्वरूप पुन्हा
एकदां सांगावें, याच हेतूने श्रीकृष्ण प्रवृत्त झाले आहेत.

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

सर्वकर्माणि, अपि, सदा, कुर्वाणः, मद्व्यापाश्रयः,
मत्प्रसादात्, अवाप्नोति, शाश्वतम्, पदम्, अव्ययम्

माझा आश्रय करणारा, नेहमीं सर्व कर्मे करीत असतांही
माझ्या कृपेनें शाश्वत आणि अविनाशी असे पद मिळवितो.

मग ह्मणे गा सुभटा । तो क्रमयोगि इया निष्ठा ।
मी होउनि होये पैठा । माझां रूपीं ॥ १२४० ॥

मग श्रीकृष्ण म्हणाले, वीरश्रेष्ठा अर्जुना, अशा निष्ठेने तो
कर्मयोगी,मत्स्वरूप होऊन माझ्या स्वरूपात प्रविष्ट होतो.

स्वकर्माचां लाखौलीं । मज पूजा करुनि भली ।
तेणें प्रसादें आकळी । ज्ञाननिष्ठेतें ॥ १२४१ ॥

स्वकर्मरूपी पवित्र फुलांनी माझी चांगली पूजा केल्यावर,
मला प्रसन्न करून घेऊन ज्ञाननिष्टा तो प्राप्त करून घेतो.

ते निष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्हासे ।
तेया मजसीं समरसें । सुखिया होए ॥ १२४२ ॥

तो ज्ञानमार्ग जेव्हा हस्तगत होतो, तेव्हां माझी परमभक्ती उल्लसित होते;
व त्या भक्तीच्या योगाने माझ्याशी समरस होऊन तो सुखी होतो.

आणि विश्वप्रकाशितेया । आत्मेयां मज आपुलेया ।
अनुसरे जो मज करुनियां । सर्वत्रताहं ॥ १२४३ ॥

आणि विश्वाचे प्रकाशन करणारा आत्मा जो मी,
त्या मला, म्हणजे आपल्याच आत्म्याला, जो अनुसरतो,

सांडूनि आपुला आडळु । लवण आश्राये जळु ।
कां हींडौं राहे निश्चळु । वायु व्योमीं ॥ १२४४ ॥

आपला कठीणपणा टाकून जसें मीठ पाण्याशीं मिळतें,
वायू सर्वत्र हिंडून पुन्हा आकाशांत स्तब्ध होऊन राहतो,

तैसा बुद्धी वाचा कायें । जो मातें आश्राउनि ठाए ।
तो निषिद्धें हीं विपायें । कर्मे करू ॥ १२४५ ॥

त्याप्रमाणे जो बुद्धीने, वाचेने व शरीराने माझा आश्रय करून
राहतो, त्याच्याकडून चुकून एखादे वेळी निषिद्ध कर्म घडले,

परि गंगेचां संबंधीं । बीदी आणि महानदी ।
ऐक्य तेवि माझां बोधीं । शुभाशुभांसि ॥ १२४६ ॥

तरी गंगेला मिळणारा ओहोळ व महानदी ज्याप्रमाणे गंगारूप होऊन जातात,
त्याचप्रमाणें माझें ज्ञान झालें म्हणजे शुभ आणि अशुभ हीं दोन्ही एकरूपच होतात.

कां बावनेयां आणि घूरें । हा निवाडू तंव चि सरे ।
जंव नेघपति वैश्वानरें । कवळूनि दोन्हीं ॥ १२४७ ॥

चंदन आणि साधे लाकूड हा भेद जो पर्यंत
अग्नीनें घेरलें नाहीं, तोपर्यंतच टिकतो,

नाना पांचिकें आणि सोळें । हें सोनेयां तंव चि आलें ।
जंव परिसु आंगमेळें । एकवटी नां ॥ १२४८ ॥

अथवा पांचकशी व सोळकशी सोन्याचे कसाप्रमाणें होणारे भेद,
जो पर्यंत परिसाचा स्पर्श होत नाही, तोंवरच निर्माण होतो.

तेवि शुभाशुभें ऐसें । हें तंव चि वेव्हीं आभासे ।
जंव एकु न प्रकाशे । सर्वत्र मी ॥ १२४९ ॥

त्याप्रमाणे हे शुभ आणि हे अशुभ हे तो पर्यन्तच भासतात,
जोपर्यंत मीच सर्वत्र प्रकाश देणारा आहे याची जाणीव होत नाही.

आगा रात्रि आणि दीवो । हा तंव चि द्वैतभाॐ ।
जंव न रिगिजे गांॐ । गभस्तीचा ॥ १२५० ॥

अरे अर्जुना, रात्र आणि दिवस हा भेद तेथपर्यंतच असतो कीं,
जो पर्यन्त सूर्याच्या कक्षेत प्रवेश केला जात नाही.

ह्मणौनि माझिया भेटी । तेयाचीं सर्व कर्मे किरीटी ।
जाउनि बैसे तो पाटीं । सायुज्याचां ॥ १२५१ ॥

म्हणून अर्जुना, माझी भेट झाली म्हणजे त्याचीं सर्व
कर्मे लोपून तो मुक्तीच्या पदावर जाऊन बसतो.

देशें काळें स्वभावें । वेचु जेया न संभवे ।
तें पद माझें पावे । अविनाश तें ॥ १२५२ ॥

ज्या पदाचा देशानें, कालानें व स्वभावानें कधीं नाश
होत नाहीं, त्या माझ्या अविनाशी पदाला तो प्राप्त होतो.